दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३१२ | गुरूवार, दि.६ मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

राजकारणी योग्य धडा घेतील

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारमधील एक मंत्री धनंजय मुंडे यांनी अखेर राजीनामा दिल्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये गेले कित्येक दिवस विचारल्या जाणाऱ्या एका प्रश्नाला पूर्णविराम मिळाला आहे. पण त्याचबरोबर इतरही अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. भारतीय राजकारणात किंबहुना महाराष्ट्राच्या राजकारणामध्येसुद्धा एखादी नेता जेव्हा राजीनामा देते तेव्हा ती राजीखुशीची किंवा मनापासून केलेली कृती नसते, तर अनेक वेळा वरिष्ठ स्तरावरून आलेला दबाव आणि इतर काही कारणांमुळे त्या व्यक्तीला राजीनामा द्यावा लागतो.

हसन मुश्रीफ यांनी वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्रिपद सोडले

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात विविध घडामोडी घडत आहेत. त्यातच धनंजय मुंडे यांना आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा मंगळवारी (दि. ४) द्यावा लागला होता. तर दुसरीकडे, पालकमंत्रिपदावरून महायुतीमध्ये धुसफूस सुरूच आहे. असे असताना आता अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते हसन मुश्रीफ यांनी वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्रिपद सोडले आहे. याचे कारणही त्यांनी दिले आहे.राज्यात भाजप–शिवसेना (शिंदे गट)–राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांचे सरकार सत्तेवर आले आहे. त्यानुसार, कोल्हापूरचे पालकमंत्रिपद शिवसेनेकडे गेले आहे. सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे हा पदभार आहे.

कापसाचा बाजारभाव ५ वर्षातील निचांकी पातळीवर

आंतरराष्ट्रीय बाजारात घसरण, भारतातील बाजारावरही होणार परिणाम

पुणे । प्रतिनिधी

अमेरिकेच्या आयातीवर चीन, कॅनडाने शुल्क जाहीर करताच कापूस दरात मोठी पडझड झाली. चीनने अमेरिकेच्या कापसावर १५ टक्के आयातशुल्क लावले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाचा भाव गेल्या ५ वर्षातील निचांकी पातळीवर पोहचला. आंतरराष्ट्रीय बाजारातील या घडामोडींचा देशातील बाजारावरही परिणाम होऊ शकतो, असा अंदाज अभ्यासकांनी व्यक्त केला.

चीन जगातील महत्वाचा कापूस खरेदीदार आहे. चीनची कापूस आयात मोठी आहे. चीन ब्राझील, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिकेतून कापूस आयात करतो. अमेरिका कापूस उत्पादनात भारत आणि चीननंतर तिसऱ्या क्रमांकावर असतो. अमेरिकेत कापसाचे उत्पादन जास्त होत असले तरी वापर मात्र कमी असतो. त्यामुळे चीनला कापूस निर्यातीवर अवलंबून राहावे लागते. जागतिक बाजारात जसे अमेरिकेच्या पुरवठ्याचा परिणाम होतो तसेच चीनच्या मागणीचा परिणाम होत असतो. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ट ट्रम्प यांनी चीनच्या वस्तुंवर आयात कर लावला. त्याच्या प्रत्यत्तरादाखल चीनने देखील अमेरिकेतून आयात ◀◀ पान २ वर

बाजारवरील परिणाम

चीन आणि अमेरिकेच्या व्यापार युध्दात भारताचा थेट सहभाग नसला तरी आंतरराष्ट्रीय बाजारात कापूस दरावर होणार परिणामापासून देशातील बाजारही दूर राहू शकत नाही. आंतरराष्ट्रीय बाजारात तुटलेल्या भावाचा दबाव देशातील बाजारावरही झाला. त्यामुळे कापसाच्या भावात मोठी नरमाई दिसत नसली तरी मोठी वाढही सध्यातरी दिसत नाही, असे कापूस बाजारातील अभ्यासकांनी सांगितले.

लोकांना माज आलाय; मारहाणीचे रिल्स तयार करताहेत

व्हायरल व्हिडिओवरुन पंकजा मुंडे कडाडल्या

मुंबई । पतिनिधी

बीडमधील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणावरुन महाराष्ट्र हळहळला आहे. संतोष देशमुख यांना मारहाण करतानाचा फोटो व्हायरल झाल्यानंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली. एकीकडे बीड आणि वाल्मिक कराड व मुंडे समर्थकांच्या घटनांची चर्चा होत असताना, मारहाण व बंदुका घेऊन रिल्स बनवले जात असल्यावरुन तीव्र संताप व्यक्त होत आहे. मात्र, अद्यापही अशाप्रकारची अमानुष मारहाण सुरू असून त्याचे व्हिडिओ व्हायरल होत आहेत. जालना, बीड आणि नगर जिल्ह्यातील असेच काही व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. यासंदर्भात आता जालनाच्या पालकमंत्री ◀◀ पान २ वर

शिरुरमधील मारहाणीचा व्हिडिओ व्हायरल

बीडच्या शिरूर कासार तालुक्यातील बावी गावात अमानुष मारहाणीचा एक थरारक व्हिडीओ समोर आला आहे. एका व्यक्तीला निर्घृण मारहाण करताना दिसत आहे. या प्रकरणात अद्याप शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. मारहाण करणारा व्यक्ती हा तसेच मारहाण झालेल्या व्यक्तीचे नावही समोर आलेले नाही. मात्र, मारहाण करत असताना अत्यंत अमानुष पद्धतीने तळपायावर बॅटच्या साह्याने मारले जात आहे. हे अत्यंत धक्कादायक असून अमानुष पद्धतीने मारहाण केली जात आहे.

जालन्याच्या 'त्या' अत्याचाराची पंकजाताई मुंडे यांनी घेतली दखल

जालनाः अन्वा (ता. भोकरदन) येथील कैलास बोराडे या तरूणांवर झालेल्या अत्याचार प्रकरणाची जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी गंभीर दखल घेतली असून यासंदर्भात त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांना आज दूरध्वनीवरून संपर्क साधून आरोपींविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान, त्या तरूणाच्या कुटुंबियांनी ना. पंकजाताईंची मुंबईत भेट घेतली. महाशिवरात्रीच्या दिवशी अन्वा येथील रहिवासी असलेल्या कैलास बोराडे या तरुणास कार्ला जानेफळ येथील वटेश्वर मंदिरात भागवत दौंड व नवनाथ दौंड यांनी मारहाण करून भट्टीत गरम केलेल्या सळईने सर्व अंगावर डाग देऊन अतिशय अमानुषपणे अत्याचार केले. बोराडे याच्यावर सध्या रूग्णालयात उपचार सुरू आहेत, दरम्यान पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज पोलिस अधिक्षकांशी फोन करुन घटनेची सविस्तर माहिती घेतली. या घटनेतील एक आरोपी अटकेत आहे. दुसर्याचा शोध तातडीने लावून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी असे आदेश त्यांनी पोलिस अधीक्षकांना दिले. दरम्यान कैलास बोराडे या तरूणांच्या भावाने आणि कुटुंबातील सदस्यांनी ना. पंकजाताई मुंडे यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी कैलासच्या प्रकृतीची आस्थेने चौकशी केली आणि आरोपींविरुद्ध कठोर कारवाई करण्याबद्दल कुटुंबियांना आश्वस्त केले.

धनंजय मुंडेंचा राजीनामा का घेतला?

फडणवीस यांनी पहिल्यांदाच सांगितले कारण; ते फोटो आरोपपत्र दाखल झाल्यावर पाहिले

मुंबई । प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्येचे फोटो समोर आल्यानंतर धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्यात आला. त्यांनी आजारपणाचे कारण पुढे केले, अजितदादांनी नैतिकतेचे कारण दिले. आता मुख्यमंत्र्यांनी त्यामागील कारणं स्पष्ट केले आहे. तसेच हत्येचे ते फोटो आरोपपत्र दाखल झाल्यावरच पाहिले असल्याचे ते म्हणाले.

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूर हत्या करण्यात आली. सीआयडीने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केल्यानंतर ◀◀ पान २ वर

धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याचे कारण काय?

धनंजय मुंडे यांचा राजीनामा योग्यवेळी झाला, चुकीच्यावेळी झाला याच्या चर्चेत मी जात नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. राजकारणात पहिला दिवस असो की शेवटचा दिवस लोकांना बोलायचे ते बोलतात. फोटो आले, हत्या ज्या प्रकारची झाली आहे आणि हत्येचा मास्टरमाइंड ज्याला म्हटले गेले तो मंत्र्यांच्या इतक्या जवळचा आहे तर मंत्र्याने नैतिकतेच्या आधारे राजीनामा दिला पाहिजे. आघाडीचे सरकार आहे. त्यामुळे निर्णय घ्यायला उशीर होता. पण फर्मली आम्ही डील केले आणि त्यांनी राजीनामा दिला, असा घटनाक्रम आणि कारण त्यांनी दिले.

मुंडेंच्या राजीनाम्यावर नेमके काय म्हणाले फडणवीस?

सीआयडीवर कोणताही दबाव नव्हता. धनंजय मुंडेंच्या इथे बैठक झाली, धनंजय मुंडेंनी कारवाईत हस्तक्षेप केला असा एक जरी सबूत सीआयडीला मिळाला असता तर सीआयडीने कारवाई केली असती, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. पण माझ्या माहितीनुसार अशी काही गोष्ट नाही. आमच्या पक्षाचे आणि विरोधातील लोक काही आरोप करत असतात. प्रॉसिक्युशन भावनेवर चालत नाही. हार्ड इव्हिडन्सवर चालते. कोणताही आरोपी सुटणार नाही. अत्यंत कठोर शिक्षा केली जाईल, असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला. राजीनामा दिला नाही तर तुम्हाला मंत्रिमंडळाबाहेर काढण्यात येईल, अशी धमकी मुंडे यांना फडणवीस यांनी दिल्याची माहिती सातत्याने पुढे येत होती, याविषयी मुख्यमंत्र्यांना विचारले असता, त्यांनी अत्यंत संयमित उत्तर दिले. 'मला जे सांगायचे होते. ते मी सांगितले. ते मी सांगत नाही. त्या उपर सांगणं योग्य नाही, अशा शब्दात त्यांनी काय सांगायचे ते न सांगता ही सांगून टाकले.

मंदिर प्रवेशावरुन तरुणाला दिले चटके; आव्हाड संतापले

जालना । प्रतिनिधी

राज्यामध्ये अत्याचाराच्या रोज नवीन घटना समोर येत आहेत. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून निर्घृणपणे हत्या करण्यात आली. हे प्रकरण ताजे असतानाच याचप्रमाणे जालन्यामध्ये केवळ मंदिरात प्रवेश केला म्हणून एका तरुणाच्या उघड्या अंगावर लोखंडी सळईने गरम चटके दिल्याचा व्हीडीओ समोर आला आहे.

शरद पवार गटाचे नेते व आमदार जितेंद्र आव्हाड यांनी हा व्हीडीओ शेअर केला आहे. यामध्ये एका तरुणावर काही लोकांकडून अमानुष अत्याचार होत असल्याचे दिसत आहे. कैलास बोराडे असे या तरुणाचे नाव असल्याचे समोर येत आहे. तरुणाच्या उघड्या अंगावर हे जळत्या सळईचे चटके दिले जात आहेत. तापलेल्या रॉडने कैलासच्या ◀◀ पान २ वर

कायदा–व्यवस्था वेशीला टांगली : आव्हाड

जितेंद्र आव्हाड यांनी व्हीडीओ शेअर करताना लिहिले आहे की, संतोष देशमुख यांच्या हत्येने क्रौर्याची परिसीमा गाठल्याचे सबंध महाराष्ट्राने पाहिलेले असतानाच आता लातूरच्या जानेफळ गावात महाशिवरात्रीच्या दिवशी कैलास बो–हाडे या तरुणाची कातडी सोलल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. गोरगरीब मागासवर्गीय समाजातील तरुणाची केवळ मंदिरात प्रवेश केला म्हणून गरम सळईचे चटके देऊन पाठ सोलली जात असल्याची टीका आव्हाड यांनी केली आहे.

माणिकराव कोकाटेंच्या शिक्षेला स्थगिती

नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयाचा निर्णय

नाशिक । प्रतिनिधी

राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे याना न्यायालयाकडून मोठा दिलास मिळाला आहे. नाशिकच्या जिल्हा सत्र न्यायालयाने त्यांच्या शिक्षेला बुधवारी स्थगिती दिली आहे. त्यांच्या शिक्षेच्या स्थगिती अर्जावर सुनावणी पार पडली त्यावेळी न्यायालयने हे आदेश दिले.

बनावट दस्तावेजाच्या आधारे अल्प उत्पन्न गटातून शासकीय कोट्यातील सदनिका लाटून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी न्यायालयाने ॲड. कोकाटे आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे यांना २ वर्षांचा कारावास आणि प्रत्येकी ५० हजार रुपये दंड, अशी शिक्षा सुनावली होती. दरम्यान, माणिकराव कोकाटेंकडून शिक्षेला आव्हान देणारी याचिका नाशिकच्या जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल ◀◀ पान २ वर

राज्यात पुन्हा मोठा घोटाळा; बांधकाम कामगारांच्या किटवर श्रीमंतांचा डल्ला? सरकारच्या अडचणीत वाढ

नागपूर । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर आता एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना मोठा घोटाळा झाला असा आरोप नागपूरचे काँग्रेसचे शहराध्यक्ष आणि पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विकास ठाकरे यांनी केला आहे. त्यांच्या या आरोपामुळे सरकार समोरचे संकट पुन्हा वाढणार का अशी चर्चा सुरु झाली आहे.

विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीच्यावतीने असंघटित क्षेत्रातील बांधकाम कामगारांना मोठ्या प्रमाणावर साहित्याचे वाटप करण्यात आले होते. यासाठी मोठमोठे कार्यक्रम करण्यात आले होते. हजारो कामगारांना एकाच दिवशी साहित्याची किट वाटप करण्यात आली होती. यामध्ये मोठा घोटाळा झाला असल्याची शंका व्यक्त केली जात आहे. आ. विकास ठाकरे यांनी माहिती

अधिकार कायद्यांतर्गत लाभार्थ्यांची यादीच मिळवली असून कामगार मंत्र्यांकडे सादर केली आहे. त्यामुळे शिंदे सरकारच्या कार्यकाळातील आणखी एक घोटाळा समोर येण्याची शक्यता आहे. आपल्याकडे लाभार्थ्यांची यादी असून यातील काही लाभार्थी हे कामगार नाहीत, अशांना किट वाटप करण्यात अली आहेत, असा दावा अर्थसंकल्पीय अधिवेशनात विकास ठाकरे यांनी केला आहे. यावर कामगार मंत्री काय कारवाई करणार अशी विचारणा ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.५ मार्च २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू: ३९८.०० क्विंटल			
	२,४००	३,०४१	२,७४०
ज्वारी/हायब्रिड: ४०६.०० क्विंटल			
	१,८००	४,०००	२,५२१
मका/लोकल:२०.०० क्विंटल			
	२,१५०	२,१५०	२,१५०
तूर :४४.००क्विंटल			
	६,८००	७,२१५	७,०८१
उडीद : ७.५० क्विंटल			
	५,१००	५,१००	५,१००
बाजरी: ९.०० क्विंटल			
	२,२१०	३,११४	२,६६८
मुग :४.५० क्विंटल			
	६,५०१	७,४५१	६,९७६
सोयाबीन: ६.०० क्विंटल			
	४,०४०	४,०४०	४,०४०
हरभरा: ७३.०० क्विंटल			
	५,१५०	७,२०१	५,५६४

अधिवेशन काळात विधानभवनात सरसकट प्रवेश बंदी–विधानसभा अध्यक्ष नार्वेकरांचा निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

राज्य विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. या निमित्त राज्यभरातील कार्यकर्त्यांचा आणि नागरिकांचा मोठ्या प्रमाणात वावर विधान भवनात दिसून येत आहे. मोठी गर्दी होत असल्याच्या तक्रारी अनेक आमदारांकडून करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे विधान भवन परिसरातील वाढती गर्दी लक्षात घेता विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी अधिवेशन काळात विधानभवनात सरसकट प्रवेश बंदी करण्याच्या सुचना दिल्या आहेत. अत्यंत महत्त्वाच्या कामासाठी प्रवेश दिला जाणार आहे.

अबू आझमीवर कारवाई कराच पण शिवाजी महाराजांचा अपमान करणाऱ्यांवर कारवाई कधी

• काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांचा संतप्त सवाल

मुंबई । प्रतिनिधी

समाजवादी पार्टीचे आमदार अबू आझमी यांनी औरंगजेब बाबत वादग्रस्त वक्तव्य केले. या प्रकरणी सरकारने अबू आझमी यांचे निलंबन करण्याचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावावर बोलताना काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, आमदार अबू आझमी यांचे वक्तव्य बेजबाबदार पणाचे होते. त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, या कारवाईचा काळही वाढवला पाहिजे, सरकारच्या या कारवाईला आमचा पाठिंबा आहे. पण छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान करणाऱ्यांवर सरकार का कारवाई करत नाही ◀◀ पान २ वर

सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठीचे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील लाखो विद्यार्थ्यांसह सामान्य नागरिकांना दिलासा देणारा मोठा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. शासकीय कार्यालयात दाखल करायच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावे लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्यात आले आहे. या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे आदेश बावनकुळे यांनी दिले आहेत.

जात पडताळणी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेयर सर्टिफिकेट, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्रासह शासकीय कामासाठीच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावे लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क आता माफ असेल. यापुढे एका साध्या कागदावर स्वसाक्षांकित (सेल्फ अटेस्टेट) अर्ज लिहून प्रमाणपत्र तहसील कार्यालयातून मिळू शकेल. दहावी, बारावीच्या निकालानंतर विद्यार्थी आणि पालकांचा या सर्व प्रकारच्या प्रमाणपत्रासाठी लागणारा एकूण ३ ते ४ हजारांचा खर्च वाचणार आहे. याआधी मुद्रांक शुल्क १०० रुपयांवरून ५०० रुपयांपर्यंत वाढवण्यात आले होते. याचा फटका विद्यार्थ्यांसह सामान्य नागरिकांना बसला होता. पण हे शुल्क आता माफ करण्यात आल्याने मोठा दिलासा मिळाला आहे.

विद्यार्थ्यांचा ३ ते ४ हजारांचा खर्च वाचणार

सध्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा सुरु आहेत. जेव्हा या परीक्षांचा निकाल लागतो, तेव्हा सर्व विद्यार्थी व पालकांची ही सर्व प्रमाणपत्रे जमा करण्यासाठी झुंबड उडते. आतापर्यंत सर्व प्रमाणपत्रासाठी किमान ३ ते ४ हजारांचा खर्च पालकांना लागायचा. यापुढे कसलेही मुद्रांक शुल्क न भरता केवळ स्वसाक्षांकित अर्ज लिहून तहसील कार्यालयातून प्रमाणपत्र मिळू शकणार आहेत. त्यामुळे दरवेळी पालकांचा होणारा ३ ते ४ हजारांचा खर्च इथून पुढे होणार नाही. केवळ शैक्षणिकच नाही तर इतर अनेक कारणांसाठी प्रतिज्ञापत्र दाखल करताना ही सर्व प्रमाणपत्रे वेळोवेळी लागत असतात. त्यामुळे हा निर्णय राज्यातील कोट्यवधी नागरिकांसाठी लाभदायी असणार आहे, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

अग्रलेख

राजकारणी योग्य धडा घेतील

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारमधील एक मंत्री धनंजय मुंडे यांनी अखेर राजीनामा दिल्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये गेले कित्येक दिवस विचारल्या जाणाऱ्या एका प्रश्नाला पूर्णविराम मिळाला आहे. पण त्याचबरोबर इतरही अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. भारतीय राजकारणात किंबहुना महाराष्ट्राच्या राजकारणामध्येसुद्धा एखादी नेता जेव्हा राजीनामा देते तेव्हा ती राजीखुशीची किंवा मनापासून केलेली कृती नसते, तर अनेक वेळा वरिष्ठ स्तरावरून आलेला दबाव आणि इतर काही कारणांमुळे त्या व्यक्तीला राजीनामा द्यावा लागतो. ही कृती नाराजीतूनच झालेली असते. धनंजय मुंडे यांच्या बाबतही तसेच झाले आहे. राजीनामा देत असताना त्यांनी वैयक्तिक कारणाचा हवाला दिला आहे.

'आरोग्याच्या कारणावरून मी राजीनामा देत आहे' असे त्यांनी म्हटले असले तरी बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणाचा संदर्भ त्याच्याशी आहे हे सहजपणे लक्षात येते. दोन दिवसापूर्वी जेव्हा या खून प्रकरणाची काही भीषण छायाचित्रे व्हायरल झाली तेव्हा या विषयाचे गांभीर्य जास्तच समोर आले आणि आता हा विषय जास्त ताणता येणार नाही हे लक्षात आल्याने धनंजय मुंडे यांना राजीनामा द्यावा लागला आहे. महाराष्ट्र विधिमंडळ अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जी बैठक झाली होती त्यामध्येच या राजीनाम्याबाबत निर्णय झाला असल्याचेही समजते. माझ्याकडून अनावधानाने एक चूक घडली तेव्हा मी लगेच नैतिकतेच्या भावनेतून राजीनामा दिला होता अशी आठवणही अजित पवार यांनी करून दिली होती. तरीसुद्धा धनंजय मुंडे यांनी राजीनामा देण्याची प्रक्रिया लांबवत ठेवली. दुसरीकडे भाजपचे बीडमधील नेते सुरेश धस यांनी ज्या प्रकारे हा विषय लावून धरला आणि सामाजिक पातळीवरील आंदोलनाची तीव्रता वाढत होती ते पाहता जास्त काळ आपण पदावर राहणे योग्य ठरणार नाही हे लक्षात आल्यानेच अखेर धनंजय मुंडे यांना पायउतार व्हावे लागले.

सर्वसाधारणपणे राजकारणामध्ये जेव्हा एखाद्या मंत्र्यावर किंवा मोठ्या नेत्यावर आरोप होतात तेव्हा त्या मंत्र्याने त्वरित राजीनामा दिला तर त्याने त्या आरोपांचा स्वीकार केला असे गृहीत धरले जाते. म्हणूनच भारतीय राजकारणामध्ये आता अशा आरोपांनंतर शक्यतो शेवटपर्यंत राजीनामा देणे टाळले जाते. ज्या देशात रेल्वे अपघातानंतर केवळ नैतिक जबाबदारी स्वीकारून लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे नेते रेल्वेमंत्रिपदाचा त्याग करतात त्याच देशामध्ये आता गंभीर आरोपानंतर आपले पद सोडण्याची नैतिकता नेत्यांमध्ये राहिलेली नाही हेच सिद्ध होत आहे. धनंजय मुंडे यांच्या या राजीनाम्यानंतर या विषयापुरता पूर्णविराम मिळाला असला तरी राजकारणातील मनी पॉवर आणि मसल पॉवरचा विषय मात्र ज्वलंत चर्चेचा राहणार आहे. कारण ज्या वाल्मिक कराडमुळे धनंजय मुंडे अडचणीत आले असे अनेक वाल्मिक कराड बहुतेक राजकारणी नेत्यांच्या पदरी असतात आणि या राजकारण्यांची वेगळ्या प्रकारची कामे करण्याची जबाबदारी त्यांच्याकडेच असते. आपल्यावर राजकारणी नेत्याचा आशीर्वाद असल्यामुळे आपले कोणीही वाकडे करू शकत नाही ही भावना त्यांच्या मनात निर्माण झाल्यामुळेच संतोष देशमुख खून प्रकरणासारखी टोकाची विकृत घटना घडू शकते. साहजिकच धनंजय मुंडे यांच्या या राजीनाम्यानंतर अशा प्रकारे राजकारणामध्ये मसल पॉवरचा वापर करणारे राजकारणी योग्य धडा घेतील अशी आशा या निमित्ताने करावी लागणार आहे. केवळ हे राजकारणी नेते नव्हे तर हे नेते ज्या पक्षाचे प्रतिनिधित्व करतात त्या पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांनीसुद्धा आगामी कालावधीमध्ये काळजीपूर्वक राजकारण करावे लागणार आहे.

राजकारण्यांच्या दबावामुळे शासकीय यंत्रणा योग्य प्रकारे काम करू शकत नाही अशी भावना सर्वसामान्य नागरिकांच्या मनात निर्माण झाली आहे हेसुद्धा लक्षात घ्यावे लागणार आहे. धनंजय मुंडे यांनी नाराजीने का होईना दिलेल्या या राजीनाम्यामुळे संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या सुनावणीला वेग येईल आणि या विकृत खून प्रकरणातील आरोपींना योग्य प्रकारचे शासन केले जाईल ही भावना तरी आता किमान बीडमधील सर्वसामान्य नागरिकांच्या मनात निर्माण झाली आहे.

जवखेडा ठोंबरी येथे एका कुटुंबावर बहिष्कार; कुटुंबीयाची जिल्हा प्रशासनाकडे धाव

दहावीच्या परीक्षा जाण्यास मुलीला रोखले?

जालना । पतिनिधी

जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यात असलेल्या जवखेडा ठोंबरी या गावातील एका कुटूंबावर बहिष्कार घातल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलाय. या संदर्भात पिडीत कुटुंबाने जिल्हा प्रशासनाकडे धाव घेतली असून न्याय देण्याची मागणी केलीय. या पीडित कुटुंबाच्या मदतीसाठी आंबेडकरी नेत्यांनी पुढाकार घेतला असून जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक आणि सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त यांची भेट घेत सुरक्षा आणि न्याय देण्याची मागणी केली.

जवखेडा ठोंबरे येथील मंडाबाई भाऊराव वाघ रा. जवखेडा ठोंबरे, ता. भोकरदन यांच्या मुलाने मुलीची छेड काढल्याच्या कारणावरुन गावातील काही लोकांनी त्यांच्या जवखेडा ठोंबरी शिवारातील गट नं. १६८ मध्ये लागवड केलेल्या पिकाची नासधुस केली. शिवाय त्यांच्या शेतात उत्खनन करुन शेतीचे नुकसान केले. शिवाय कुटुबावर बहिष्कार टाकला असून त्यांना गावात कोणत्याही सोई सुविधा दिल्या जात नाहीत. त्यांना दैनंदिन गरजेच्या वस्तु तसेच वाहतुक करणाया वाहनातही बसू दिले जात नाही. या कुटुबातील एका मुलीची १० वी ची परिक्षा सुरु आहे. तीला परिक्षेसाठी जाण्यासाठी गाडीत बसू दिले जात नाही. हा सर्व प्रकार या पिडीत कुटुंबाने जिल्हा प्रशासनासमोर कथन केलाय.

झोपडपट्टी धारकांना पी.आर.कार्ड साठी सर्वपक्षीय बैठक घेणार-रावसाहेब दानवे

जालना । पतिनिधी

जालना शहरातील झोपडपट्टी धारकांना हक्काचे पी .आर .कार्ड मिळवून देण्यासाठी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींची बैठक घेऊन तोडगा काढणार असल्याची माहिती माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी दिली.

आनंदेश्वर महादेव मंदिर आणि दक्षिणमुखी हनुमान मंदिराजवळ स्व.बालचन्द्र भुरेवाल प्रवेशद्वाराचे उद्घाटन रविवारी (ता. ०२) रावसाहेब पाटील दानवे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी आ.कैलास गोरंट्याल, जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर, रमेशभाई पटेल, जिल्हा उपाध्यक्ष भास्करराव दानवे , हेमराज भुरेवाल, बाला परदेशी,सिध्दीविनायक मुळे, सतीश जाधव, धनराज काबलिये, सुनील खरे , विजय कामड, रवि इंचे, नेमीचंद भुरेवाल, संदीप नाईकवाड़े यांची उपस्थिती होती. रावसाहेब पाटील दानवे यांनी झोपडपट्टी धारकांच्या हक्कांसाठी लढणारे स्व.बलीराम यादव यांच्या कार्यास उजाळा दिला. माजी आ. कैलास गोरंट्याल यांनी रेल्वे स्थानकाजवळ क्रीडांगण विकसित करण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी केली. शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी पन्नास टक्के जनता झोपडपट्टी भागात राहत असून पी. आर. कार्ड नसल्याने शासनाच्या घरकुल योजनेचा लाभ त्यांना मिळत नाही. पदावर नसले तरीही रावसाहेब दानवे यांचे केंद्र आणि राज्य शासनात मोठे वजन आहे. शहरातील झोपडपट्टी भागात विकास कामांसाठी आपले वजन वापरून शहरातील व ग्रामीण भागातील नागरिकांचे प्रश्न मार्गी लावावे असे श्री दानवे यांनी श्री भास्कर आंबेकर यांना कळविले.

अनुसूचित जाती जमातीच्या सुशिक्षित बेरोजगार युवक युवतींसाठी उद्योजकता विकास प्रशिक्षण

बीड । पतिनिधी

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती नव उद्योजकांसाठी विशेष सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत सन २०२४-२५ करिता निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत मराठवाडा विभागामध्ये ३२० नव उद्योजकांना निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम( ) व तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम ()प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन विभागीय स्तरावर छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी करण्यात आले आहे.

सदरील प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये उद्योग संधी, उद्योगाची निवड, उद्योगाचे व्यवस्थापन, लघुउद्योग, सेवा उद्योग, व्यापार उद्योग उद्योगातील विविध टप्पे, उद्योजकीय गुणसंपदा, उद्योगाची जाहिरात, मार्केटिंग, संवाद कौशल्य, प्रकल्प अहवाल, शासकीय कर्ज व अनुदान विषयक योजनांची माहिती, प्रत्यक्ष उद्योगांना भेटी, यशस्वी उद्योजकाचे मार्गदर्शन, उद्योगासाठी लागणारे परवाने, लायसन्स ,इत्यादी विषयावर निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये मार्गदर्शन करण्यात येणार असून सदरील प्रशिक्षण कार्यक्रम हा दिनांक १० मार्च २०२५ ते २४ मार्च २०२५ या कालावधी दरम्यान महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र मुख्य कार्यालय छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी निवासी प्रशिक्षण कार्यक्रमाची व्यवस्था करण्यात आली असून सदरील प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या लाभार्थींचे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत कर्ज प्रस्ताव तयार करण्यात येणार आहेत. सदरील प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये बीड जिल्ह्यातून २० लाभार्थींची प्रत्यक्ष मुलाखती द्वारे निवड करून सदरील प्रशिक्षणासाठी पाठवण्यात येणार आहे.तसेच तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण ()कार्यक्रमांतर्गत १) सीएनसी मशीननिंग(अनुसूचित जाती प्रवर्ग) २)डीडी प्रिंटिंग अँड रिव्हर्स इंजीनियरिंग(अनुसूचित जाती प्रवर्ग)३) फूड अँड प्रोसेसिंग (अनुसूचित जमाती प्रवर्ग)४)सोलर पीव्ही टेक्निशियन(अनुसूचित जमाती प्रवर्ग) इत्यादी टेक्निकल प्रशिक्षण कोर्स आयोजित करण्यात आले असून सदरील प्रशिक्षण कार्यक्रम हा दिनांक १७ मार्च २०२५ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधी दरम्यान महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र मुख्य कार्यालय छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी ४५ दिवस निवासी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यामध्ये संपूर्ण तांत्रिक मार्गदर्शनासह उद्योजकीय मार्गदर्शन करण्यात येणार आहे सदरील प्रशिक्षणासाठी बीड जिल्ह्यातून प्रत्येक प्रशिक्षणासाठी ५ लाभार्थी याप्रमाणे २० लाभार्थी प्रत्यक्ष मुलाखती द्वारे निवड करून प्रशिक्षणासाठी छत्रपती संभाजीनगर येथे पाठवण्यात येणार आहेत. या प्रशिक्षण कार्यक्रमांमधून एसटी अनुसूचित जमाती प्रवर्गातील तांत्रिक प्रशिक्षण १० व उद्योजकता विकास प्रशिक्षण १० लाभार्थीसे एकूण २० लाभार्थींची निवड करून पाठवण्यात येणार असून (एस सी)अनुसूचित जाती प्रवर्गातील तांत्रिक प्रशिक्षण १० लाभार्थी व उद्योजकता विकास प्रशिक्षण १० असे एकूण २० लाभार्थींची निवड करून छत्रपती संभाजीनगर येथे प्रशिक्षणासाठी पाठवण्यात येणार आहेत. सदरील प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्यातील होतकरू तरुण-तरुणींना प्रशिक्षणाद्वारे उद्योगाच्या क्षेत्रामध्ये स्वतःचे करिअर करण्यासाठी संधी मिळणार आहे. निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम दिनांक ७ मार्च २०२५ असून त्याच दिवशी दुपारी २ ते ५ या वेळेमध्ये प्रत्यक्ष मुलाखती द्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. तसेच तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाच्या प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम तारीख १२ मार्च २०२५ असून त्याच दिवशी दुपारी २ ते ५ या वेळेमध्ये प्रवेश अर्ज भरलेल्या लाभार्थींची प्रत्यक्ष मुलाखती द्वारे जिल्हा उद्योग केंद्र संचेती बिल्डिंग गुडलक हॉटेल च्या बाजूला जालना रोड बीड या ठिकाणी निवड करण्यात येणार आहे. वरील प्रशिक्षण कार्यक्रमाचा बीड जिल्ह्यातील बेरोजगार होतकरू तरुण युवक युवतींनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक किरण जाधव बीड व श्री दत्तात्रय क्षीरसागर प्रकल्प अधिकारी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र बीड तसेच सुदाम थोटे विभागीय अधिकारी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र छत्रपती संभाजी नगर यांनी केले आहे.

पगारीसाठी तलाठी यांच्याकडे ई आधार खाते क्रमांक जमा करावे -तहसीलदार चव्हाण

अंबड । प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील संजय गांधी निराधार व इतर योजनेतील सर्व लाभार्थी यांना सुचित करण्यात येते की, आपल्या अनुदानाची रक्कम डीबीटी द्वारे वितरित होत असून आपल्या मार्फत इ आधार कार्ड अपडेट करून ई केवायसी करणे गरजेचे आहे. तसेच यानंतर तलाठी किंवा मंडळाधिकारी यांच्याकडे जमा करावे असे आवाहन लाभार्थ्यांना तहसीलदार श्री विजय चव्हाण यांनी केले आहे.

अंबड तालुक्यात १९३३० एवढे लाभार्थी असून त्यापैकी ७९९८ लाभार्थ्यांचे व्हेरिफिकेशन झालेले आहे त्याचे अपडेशन करण्यात आलेले आहे. सदर लाभार्थ्यांचे अनुदान पैसे झाल्यानंतर आधार अपडेट असलेल्या बँक अकाउंट/ पोस्ट खाते किंवा जिल्हा नागरी बँक या खात्यामध्ये वितरित झालेली आहे.. ज्या लाभार्थ्यांनी इ आधार अपडेट केलेले आहे तसेच ई केवायसी केलेली आहे अशा लाभार्थ्यांचे अनुदानाचे पैसे त्यांनी आधार अपडेट केलेल्या खात्यामध्ये गेलेले आहे. तरी अशा लाभार्थ्यांनी तहसील कार्यालयात येऊन आपला विनाकारण वेळ घालू नये व तसेच एजंट पासून सावधान राहावे .विचारणा करण्याऐवजी त्यांनी सर्व खाते तपासणी करून घ्यावी जेणेकरून लाभार्थ्यांची गैरसोय होणार नाही. त्यासोबतच जे लाभार्थी आधार अपडेट केलेले नाही त्यांनी तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांमार्फत आपले इ आधार तसेच बँक अकाउंट त्यांच्याकडे जमा करावे जेणेकरून कार्यालयामार्फत सदरील इ आधार अपडेशन करून डायरेक्ट डेबिट म्हणजेच डीबीटी द्वारे आपल्या खात्यामध्ये आपले अनुदान जमा होईल. तरी की कोणत्याही लाभार्थ्यांनी तहसील कार्यालयात येऊन गैरसोय करून घेण्याऐवजी आपापल्या सज्जातील तलाठी व मंडळ अधिकारी यांचे मार्फत दिल्यास त्यांचे इ आधार अपडेट करण्यात येईल कार्यालयात सहा ऑपरेटर लावण्यात आलेले असून सदरील काम मोठ्या प्रमाणात प्रगतीपथावर आहे लाभार्थ्यांनी कोणत्याही मध्यस्थ अथवा दलाल यांच्याशी संपर्क करू नये. काही दलाल अथवा मध्यस्थ लाभार्थ्यांची दिशाभूल करत असल्याबाबतची तक्रारी व माध्यमे मार्फत ऐकण्यात आलेली आहे.त्यामुळे सर्व लाभार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीमध्ये कोणत्याही मध्यस्थ अथवा दलाल यांच्याकडे न जाता तलाठी मंडळ अधिकारी यांच्या मार्फत इ आधार सादर करावे जेणेकरून आपले लाभ डीबीटी द्वारे आपल्या खात्यात जमा होईल असे यावेळी सर्व लाभार्थ्यांना सुचित करण्यात येत आहे.

पान १ वरून...

कापसाचा बाजारभाव

होणाऱ्या वस्तुंसह शेतीमाल आयातीवर कर लावला. चीनने अमेरिकेच्या सोयाबीन, ज्वारी, फळे, भाजीपाला, डेअरी उत्पादनांवर १० टक्के आयात शुल्क लावले. तर कापूस, गहू, मक्यावर १५ टक्के आयातशुल्क लावले. तसेच चीन आयात शुल्कात वाढ करु शकतो, ही चर्चा बाजारात सुरु झाली आणि त्याचा परिणाम बाजारवर दिसून आला. केवळ चीनच नाही तर कॅनडानेही अमेरिकेच्या कापूस आयातीवर शुल्क लागू केले. याचा परिणाम अमेरिकेच्या बाजारावर झाला. कापसाचा भाव मंगळवारीच जवळपास ३ टक्क्यांनी तुटला होता. न्यूयॉर्क कॉटन एक्सचेंजवर कापसाचा भाव गेल्या ५ वर्षातील निचांकी पातळीवर पोचला होता. मागील काही महिन्यांपासून कापसाला ६६ सेंट प्रतिपाऊंडचा एक सपोर्ट मिळत होता. मात्र अमेरिका आणि चीनच्या व्यापार युध्दामुळे ६६ सेंटचा आधार तुटला आणि बाजार ६३ सेंटपर्यंत खाली आला होता.

धनंजय मुंडेंचा

त्यांच्या हत्येच्या वेळेची छायाचित्र समोर आली नि महाराष्ट्रात आगडोंब उसळला. त्यानंतर धनंजय मुंडे यांचा तातडीने राजीनामा घेण्यात आला. अजितदादांसह सरकारने नैतिकतेच्या आधारावर राजीनामा दिल्याचे पालूपद लावले. तर दुसरीकडे धनंजय मुंडे यांनी आजारपणाचे कारण पुढे केले. त्यावरून वाद ओढावला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंडेंचा राजीनामा नेमका का घेतला हे स्पष्ट केले आहे. एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे स्पष्टीकरण दिले आहे. लोक सिस्टिमला समजत नाही. ज्यावेळी ही घटना घडली. त्यानंतर मी सीआयडीची चौकशी लावली. मी सीआयडीच्या लोकांना सांगितलं की त्यात हस्तक्षेप नसेल. तुम्ही पूर्ण क्षमतेने तपास करा, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. आमच्या फॉरेन्सिक टीमने डिलीट केलेले, हरवलेले मोबाईल शोधले. तसेच त्यांनी संपूर्ण डेटा दिला. त्यामुळे फोटोही समोर आले. ते फोटो कोणी शोधले नाही, तर चार्जशीटमधील आहे. सीआयडीच्या कामात कुणाचा हस्तक्षेप केला नाही. ज्या दिवशी चार्जशीट दाखल झाली, त्यावेळी मला कळलं काय तपास आहे. पण तोपर्यंत मी एकदाही सीआयडीला कुठलीही मागितली नाही. मी फोटोही पाहिले नाही, असा दावा मुख्यमंत्र्यांनी केला. चार्जशीट दाखल झाल्यावरच मी फोटो पाहिले, असे मुख्यमंत्री म्हणाले.

लोकांना माज आलाय; मारहाणीचे

पंकजा मुंडे यांनी विधानपरिषद सभागृहात माहिती दिली. संबंधित मुलाच्या पालकांना मी भेटले असून, संबंधित प्रकरणाता मोक्काअंतर्गत कारवाई होईल. सध्या मारहाण करुन रिल्स बनवले जात आहेत, लोकांना माज आलाय, असे म्हणत पंकजा यांनी तीव्र शब्दात भावना व्यक्त केल्या. जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातल्या अनवा गावात तीन दिवसापूर्वी जुन्या वादातून एका व्यक्तीस अमानुष मारहाण करून त्याला लोखंडी सळईने चटके दिल्याचा प्रकार समोर आला होता. या प्रकरणात आता शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या तालुकाध्यक्षाच्या भावाला पोलिसांनी अटक केली आहे. भागवत दौड असे या प्रकरणातील आरोपीचे नाव असून उबाठा गटाचे तालुका अध्यक्ष नवनाथ दौड यांच्या सांगण्यावरून आरोपी असलेला त्याचा या भावाने पीडित व्यक्तीला जबर मारहाण करुन चटके दिल्याचे बोलले जात आहे. याप्रकरणी, स्वत: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लक्ष्य घातले असून जखमी व्यक्तीच्या सर्व वैद्यकीय खर्चाची जबाबदारी उचलली आहे. दुसरीकडे विधानपरिषदेतही हा प्रश्न उपस्थित झाल्यावर जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडेंनी उत्तर दिले. बीडच्या शिरुर कासारमधील अमानुष मारहाणा व्हायरल व्हिडिओसंदर्भात मी पालकमंत्री अजित दादांसोबत बोलेन. तसेच, पोलिस अधीक्षक यांना देखील सूचना देईल, असे पंकजा यांनी म्हटले. जालना जिल्ह्यातील भोकरदन प्रकरणी देखील अमानुष मारहाण झाली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील याप्रकरणी मोक्का लागेल, असे सांगितले आहे. तर, त्या पोराचे कुटुंब देखील मला भेटले आहे. असे सांगत पंकजा मुंडेंनी सभागृहातूनच या व्हिडिओंवर संताप व्यक्त केला. दरम्यान, धनंजय मुंडेंवरील प्रश्नावर बोलताना, तुमच्या समोर मी त्यांना सल्ला कशाला देऊ, तुम्हाला सांगून कशाला देऊ, असे पंकजा यांनी म्हटले.

राज्यात पुन्हा मोठा घोटाळा;

देखील त्यांनी केली होती. विकास ठाकरे यांनी विचारलेल्या या प्रश्नावर कामगार मंत्र्यांनी तपासून कारवाई करू, असे आश्वासन दिले आहे.

माणिकराव कोकाटेंच्या

करण्यात आली होती, त्यावरच सुनावणी झाली. त्यानुसार त्यांच्या शिक्षेला न्यायालयने स्थगिती दिली आहे. माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामादिल्यानंत विरोधकांकडून माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. मात्र गुन्हा सिद्ध झाल्याशिवाय राजीनामा घेणार नसल्याचे राज्यसरकारकडून सांगण्यात आले आहे. नाशिक शहरातील उच्चभ्रू परिसरात माणिकराव कोकाटे यांनी ३० वर्षांपूर्वी अल्प उत्पन्न गटातून सदनिका मिळवली होती. स्वत:सह भाऊ विजय कोकाटे, पोपट सोनवणे आणि प्रशांत गोवर्धने या चार जणांनी कॅनडा कॉर्नर भागात निर्माण व्ह्यू अपार्टमेंटमध्ये मुख्यमंत्री कोट्यातून अल्प उत्पन्न गटासाठीच्या सदनिका प्राप्त केल्या होत्या. यानंतर तत्कालीन दिवंगत राज्यमंत्री तुकाराम दिघोळे यांच्या तक्रारीवरून जिल्हा प्रशासनाने सदनिका वाटपाची चौकशी केली होती. गुरुवारी (दि. २०) या प्रकरणात नाशिक न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांच्यासह त्यांच्या भावाला प्रत्येकी दोन वर्षांचा कारावास आणि ५० हजारांचा दंड अशी शिक्षा सुनावली होती.

अबू आझमीवर कारवाई कराच पण शिवाजी

असा सवालही यावेळी उपस्थित केला. अबू आझमी यांच्या निलंबनाच्या प्रस्तावावर बोलताना काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार म्हणाले, औरंगजेब नालायक होता, त्याचे आणि अबू आझमी यांच्या वक्तव्याचे समर्थन कोणी करू शकत नाही. अबू आझमी यांच्यावर सरकारने कारवाई करावी, त्याला आमचे समर्थन आहे. फक्त याप्रकरणी ठेका फक्त तुम्ही घेतला का? असा सवाल ही उपस्थित केला. तसेच पुढे बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, राहुल सोलापूरकर आणि प्रशांत कोरटकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला, यांच्यावर सरकार का कारवाई करत नाही? असा सवाल करत यांना कोणाचा राजाश्रय आहे असा संतप्त सवालही उपस्थित केला. शेवटी बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान कोणीही केला तर कारवाई झालीच पाहिजे. यावर विरोधकांनी आक्रमक होत घोषणाबाजी केली. राहुल सोलापूरकर आणि प्रशांत कोरटकर यांच्यावर कारवाई करण्याची मागणीही विरोधकांनी यावेळी केली.

अबू आझमी यांचे निलंबन

औरंगजेबाचे उदात्तीकरण करणारे वक्तव्य करणारे समाजवादी पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आणि आमदार अबू आझमी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या तारखेपर्यंत त्यांचे निलंबित करण्याचा प्रस्ताव बुधवारी विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आला. विधानसभेत मंत्री चंद्रकांत पाटील यांनी अबू आझमी यांच्या निलंबनाचा प्रस्ताव मांडला. अबू आझमी यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना औरंगजेब उत्तम प्रशासक होता, असे त्याची भलामण करणारे आणि छत्रपती संभाजी महाराजांबाबत वादग्रस्त वक्तव्य केले. त्यांची वक्तव्ये निषेधार्ह आहेत. यामुळे सभागृहाचा अवमान झाला. अबू आझमींनी विधानसभेची प्रतिमा मलीन केली. त्यामुळे अबू आझमी यांचं सदस्यत्व अर्थसंकल्प अधिवेशनाच्या शेवटच्या तारखेपर्यंत निलंबन करावे, असा प्रस्ताव मांडला.

मंदिर प्रवेशावरून तरुणाला

पायाला, पोटाला, पाठीला, मानेवर, गळ्याजवळ, दंडावर, डाव्या तळहातावर चटके देत संशयितांनी जीवे मारण्याचा प्रयत्न केला. जालन्याच्या पोलिस प्रशासनाने या घटनेची दखल घेतली असून आरोपीला अटक झाली आहे. तसेच आरोपीवर ३०७ चा गुन्हा दाखल केला आहे. मात्र या घटनांमुळे माणसांमधील माणुसकी हरवली असल्याचे पुन्हा एकदा दिसून येत आहे.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. ६ मार्च २०२५

अंभोरा पोलिस ठाण्यातील होमगार्डचा कारभार म्हणजे चहापेक्षा किटली गरम!

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलीस स्टेशन येथील पोलिस कर्मचारी पेक्षा होमगार्ड कर्मचारी जास्त अधिकार दाखवतात यांच्यावर पोलिस सपोनि यांच वर्चस्व आहे का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाणे हद्दीत सध्या परिक्षा बंदोबस्त सुरू असून अनेक होमगार्ड ठिकठिकाणच्या परिक्षा केंद्रावर तैनात आहेत.पण येथील होमगार्ड म्हणजे पोलिस नाईक, अंमलदार याच्यापेक्षा मोठे असल्याचा आव आणत आहेत.तर अनेकजण खिशात उत्तरपत्रिकेच्या झेरॉक्स घेऊन फिरत आहेत.होमगार्ड चा कारभार म्हणजे चहा पेक्षा किटली गरम असा प्रकार दिसून येत आहे.

आपापली जबाबदारी ओळखून सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता टिकवा -मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

समाजात एकिकडे सर्वत्र वणवा पेटून सर्व काही बेचिराख होत असताना दुसरीकडे एक माणूस म्हणून माझी काय भूमिका असली पाहिजे हे कळले तरच समाज एकत्रीत राहील अन्यथा सामाजिक, राष्ट्रीय एकात्मता भंग होईल असे मत डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले.

येथील देशमुख कोचिंग क्लासेसच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात ते अध्यक्षीय स्थानावरून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भाजपचे प्रवक्ते गणेश हाके, ग्रामीण पोलिस स्टेशनचे निरीक्षक राम पडळकर, उद्योजक गणेश देशमुख, सुप्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ.उद्धव शिंदे, आधार माणुसकी संस्थेचे ऍड.संतोष पवार, सरपंच शितल देशमुख, डॉ.प्रिया मुळे, प्राचार्य संजय देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलतांना डॉ.राजेश इंगोले यांनी गुणवंत हा केवळ ज्ञानाने किंवा उच्चशिक्षीत होऊन किंवा मोठ-मोठ्या पदव्या, नोकऱ्या घेऊन होत नाही. तर या सोबत त्याच्या व्यक्तिमत्वाला संस्कार आणि मानवी मूल्यांची जोड असावी लागते. शिक्षण आणि संस्कार या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्या पाहिजेत तरच मानवी संस्कार आणि मूल्य टिकतील. या कलियुगात वाढलेले अनाथाश्रम, वृद्धाश्रम, दुभंगलेली नाती याचे प्रमाण पाहिले तर मग सध्याच्या स्थितीत शिक्षणाने प्रगती झाली आहे. की, अधोगती हे कळायला वाव नाही. समाजात वाढलेली गुन्हेगारी, दिवसाढवळ्या होणारे बलात्कार, खून, चोऱ्या, दरोडे हे निश्चितच भूषणावह नाही. एकीकडे भारत महासता होण्याच्या वल्गणा होत असताना दुसरीकडे मात्र देशात दिवसेंदिवस गुन्हेगारी वाढत आहे, बेरोजगारांची संख्या वाढत आहे हा विरोधाभास आपल्याला लक्षात येत नाही का..? असा सवाल करीत आता समाजात होत असणाऱ्या अन्याय, अत्याचार याविरूद्ध सर्वसामान्य जनतेनेच पेटून उठले पाहिजे. समाजात हा वणवा पेटला असताना माझी भूमिका हा वणवा विझवणाऱ्याची असावी का पेटवणाऱ्याची हे उत्तरच या देशाला महासत्ता बनवू शकते. हा वणवा पेटला असतांना तुम्ही काय करीत होतात..? हा प्रश्न नक्कीच पुढची पिढी तुम्हाला विचारू शकते. त्यावेळी तुम्हाला त्यांना मी माझ्यापरीने हा वणवा विझविण्याचे प्रयत्न करीत होतो असे अभिमानाने सांगता आले पाहिजे असे सांगत महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेलं मी प्रथम भारतीय आणि अंतिमतः भारतीयच ही प्रखर राष्ट्राभिमानी ओळ सदोदित हृदयात कोरून ठेवली पाहिजे असे आवाहन डॉ.राजेश इंगोले यांनी केले. यावेळी बोलताना भाजप प्रवक्ते गणेश हाके यांनी विद्यार्थ्यांनी सर्व महापुरूषांचे विचार आत्मसात करून त्याप्रमाणे चालले पाहिजे तसेच आपल्या मतापित्यांचा, गुरूजनांचा जेष्ठ श्रेष्ठ, महिलाभगिनींचा आदर बाळगून समाजात वावरले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य संजय देशमुख यांनी ही संस्था शिक्षणासोबत संस्कार ज्ञानदान देण्याचे काम करीत आहे. शिक्षणाचे बाजारीकरण होत असताना ही संस्था गोरगरीब वंचित, शोषित समाजाच्या मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करत आहे, त्यांना गुणवंत, प्रज्ञावंत, शिलवंत बनवत आहे आणि याच मार्गावर चालत राहील असे आश्वासन दिले. याप्रसंगी डॉ.उद्धव शिंदे, ऍड.संतोष पवार, गणेश देशमुख, सरपंच शीतल देशमुख यांनी प्रसंगोचित मार्गदर्शन केले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना डॉ.राजेश इंगोले, गणेश हाके व इतर मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुशील सूर्यवंशी यांनी केले. तर उपस्थितांचे आभार संस्थेच्या संचालिका सुचिता देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेच्या सर्व शिक्षक व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.

बीड -परळी राष्ट्रीय महामार्गावरील खड्डा बनला मृत्यूचा सापळा

भाजपा तालुका उपाध्यक्ष महादेव सावंत यांनी दिले तहसीलदारांना निवेदन

वडवणी । प्रतिनिधी

बीड -परळी राष्ट्रीय महामार्गावरील बाहेगव्हाण ते मोरवड फाटा या दरम्यान असणाऱ्या रस्त्यावर मोठा दक्षिण उत्तर लांबीचा मोठा खड्डा पडलेला असून या खड्ड्यामुळे चार चाकी व दुचाकी वाहनधारकांच्या अपघात होऊन जखमी होण्याच्या घटना घडलेल्या आहेत तरी यामध्ये मोठा अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे सार्वजनिक बांधकाम उपक्रम विभागाने हा खड्डा तात्काळ दुरुस्ती करून बुजवून घ्यावा नसता तीव्र आंदोलन करण्याचा इशारा भाजपा वडवणी तालुका उपाध्यक्ष महादेव सावंत यांनी तहसीलदार ,सार्वजनिक बांधकाम विभाग बीड यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

राष्ट्रीय महामार्ग असणाऱ्या बीड परळी रोडवर वडवणी ते तेलगाव रस्त्यावर दरोज हजारो वाहने जा करत असून हा रस्ता बीड व परळीला जोडणारा प्रमुख मार्ग आहे परंतु या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले असून त्यामुळे चार चाकी व दुचाकी वाहनाच्या अपघात होण्याच्या घटना घडुन अनेक जण जखमी होण्याच्या घटना घडलेल्या आहे यामध्ये बाहेगव्हाण ते मोरवड फाट्यादरम्यान हॉटेल त्रिमूर्तीच्या जवळ खुप मोठा दक्षिण उत्तर लांबीचा एक ते दोन फूट खोलीचा भला मोठा खड्डा पडलेला असून यामध्ये वाहनधारकांना हा खड्डा जवळ येईपर्यंत दिसत आहेत नसल्यामुळे या खड्ड्यात चार चाकी व मोटरसायकल आदळून अपघाताच्या घटना घडलेल्या असून त्यामध्ये अनेक जण जखमी झालेले आहेत तरी रात्री अपरात्री या खड्ड्यात मोठा अपघात होऊन जिवीतहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी याकडे सार्वजनिक बांधकाम उपक्रम बीड विभागाचेही दुर्लक्ष असून नेमके हा विभाग बळी जाण्याची वाट पाहत आहे का असा प्रश्न सर्वसामान्य जनता व वाहनधारकांमधून विचारला जात आहे तरी या राष्ट्रीय महामार्गावरील पडलेले खड्डे तात्काळ दुरुस्ती करून बुजवून घ्यावेत नसता तीव्र आंदोलन करण्याचा इशारा भाजपा तालुका उपाध्यक्ष महादेव सावंत,स्वप्निल मुंडे , सतिष मुंडे,मसुदेव मुंडे, संतोष मुंडे, कल्याण शेंडगे, सुंदर शिंदे यांनी तहसीलदार वडवणी, सार्वजनिक बांधकाम विभाग बीड यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे दिला आहे या निवेदनाची प्रत महाराष्ट्र राज्याचे मंत्री मा.पंकजाताई मुंडे यांनाही देण्यात आलेली आहे.

सरपंच देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ कळंब तालुका कडकडीत बंद

कळंब । प्रतिनिधी

कळंब शहर व छोटे-मोठे खेडे- पाडे उस्फुर्तपणे बंद होते . कळंब शहरातील सर्व दुकाने सकाळपासूनच बंद होते. सरपंच यांच्या हत्तेचे फोटो समाज माध्यमात वायरल झाल्यामुळे संतापाची लाट उसळली. धाराशिव जिल्ह्यासह कळंब तालुक्यामध्ये कडकडीत बंद पाळण्यात आले.मराठा सकल समाजाचे व इतर समाजाची मागणी माननीय प्रभा फुंडगे यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनातील विषय मस्साजोग येथील सरपंच स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या अमानुष हत्या करणारे आरोपींना फाशी शिक्षा देण्यात यावी व धनंजय मुंडे यांना सहआरोपी करून उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा उप-मुख्यमंत्री पदाचा राजीनामा घेण्यात यावा तसेच गेले तीन महिन्यापासून फरार असलेल्या आरोपीला पकडण्यात अपयशी ठरलेले गृहमंत्री यांनी तात्काळ राजीनामा द्यावा. अशा अनेक मागण्या निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आल्या.

भ्रष्टाचार निर्मूलन समिती महाराष्ट्र राज्य पदाधिकाऱ्यांची निवड होणार -शांताराम खुडे

पाटोदा । प्रतिनिधी

भ्रष्टाचार निर्मूलन समिती महाराष्ट्र राज्य. समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष, मा.डॉ. चंद्रकांत उदूगडे पाटील.

यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पुणे येथे झालेल्या आढावा बैठकीत नवीन कार्यकारणी जाहीर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.सामाजिक काम करणाऱ्या इच्छुक कार्यकर्त्यांनी संपर्क साधावा. या बैठकीत नवीन कार्यकारणी जाहीर करण्याबाबत. चर्चा करण्यात आली . यामध्ये बरीच वर्ष झाली कार्यकारणी जाहीर केल्यापासून कार्यकारणीतील पदाधिकारी ज्या पदावर काम करत आहेत. त्या पदाचा फेरविचार करून प्रत्येकाला नवीन संधी देण्याबाबत आडवा बैठकी घेण्यात आली.यामध्ये महाराष्ट्राच्या कार्यकारणी मध्ये त्याचप्रमाणे पुढील. तालुका अध्यक्ष, शहराध्यक्ष. जिल्हाध्यक्ष. नवीन निवड करण्याबाबत निर्णय घेण्यात आला असून. सदर निवड प्रतिक्रिया दिनांक, मार्च १/०३/२०२५ पासून ही पत्रिका सुरू झालेली आहे. तरी सदर भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे, पदाधिकारी सदस्य यांनी या विषयावरती आपली प्रतिक्रिया आपल्या निवेदनाद्वारे कळवावी ही आपणास सर्वांना विनंती. राष्ट्रीय उपाध्यक्ष शांताराम खुडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. जे पदाधिकारी आता ज्या पदावर काम करत आहेत. त्यांनी आपल्या पदाच्या कार्यकाळामध्ये केलेल्या कामाचा थोडक्यात आढावा हा देखील समिती ऑफिसला पाठवावा. असे समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आले. जे नवीन सदस्य समितीमध्ये काम करण्यासाठी इच्छुक आहेत त्यांनी आपला बायोडेटा समितीकडे पाठवावा असे समितीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष शांताराम खुडे भ्रष्टाचार निर्मूलन समिती महाराष्ट्र राज्य. मध्यवर्ती कार्यालय, ऑफिस सेक्टर नंबर ४/३२, सेक्टर नंबर, १० प्राधिकरण भोसरी पुणे.४११०२६.येथे कळवावे संपर्क फोन नंबर, पुढील प्रमाणे ८३२९२१०५६४

भैरवनाथ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा क्रीडा महाकुंभ क्रिकेट स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक

कळंब । प्रतिनिधी

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत आयोजित क्रीडा महाकुंभ क्रिकेट स्पर्धेत खाजगी आयटीआय गटातून धाराशिव जिल्ह्यात धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ.प्रतापसिंह पाटील यांच्या प्रेरणेने भैरवनाथ अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य सतीश मातने यांच्या मार्गदर्शनाखालील वेद शैक्षणिक संकुल अंतर्गत भैरवनाथ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने दि.४ मार्च २०२५ रोजी प्रथम क्रमांक मिळवला आहे.

या उत्कृष्ट कामगिरीमुळे संस्थेच्या संघाची निवड नाशिक येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी झाली आहे. संस्थेच्या खेळाडूंनी संघभावना आणि उत्कृष्ट कौशल्याच्या जोरावर ही उल्लेखनीय कामगिरी केली. या विजयाबद्दल धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ.प्रतापसिंह पाटील, भैरवनाथ अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य सतीश मातने,भैरवनाथ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सुरज भांडे,प्रा.श्रीकांत पवार, प्रा.मोहिनी शिंदे,प्रा.अविनाश घोडके,क्रीडा शिक्षक राजकुमार शिंदे,निदेशक अविनाश म्हेत्रे, निदेशक अर्जुन मंडाळे,आदित्य गायकवाड,दिक्षा गायकवाड, विनोद कसबे,सोनाली ढमाले आदींनी विजयी प्रशिक्षणार्थींचे अभिनंदन केले आहे.व विजयी संघाला पुढील विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या आहेत.

योगेश्वरी शिक्षण संस्था इतर शिक्षण संस्थासाठी दिपस्तंभ -पालकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शतकोत्तर वाटचाल करणारी व शिक्षण क्षेत्रात दिपस्तंभ असणारी योगेश्वरी शिक्षण संस्था परिवर्तनाच्या दिशेने जाताना सामाजिक दायित्व व ज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या विकासासाठी प्रयत्नशील असल्याचे मत महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक महेश पालकर यांनी व्यक्त केले.

योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या वतीने नागापूरकर सभागृहात ४ मार्च मंगळवार रोजी विविध शाळांच्या मुख्याध्यापक तसेच विज्ञान,गणित शिक्षकांच्या एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर होते.

व्यासपीठावर शिक्षण उपसंचालक प्रकाश मुकूंद,शिक्षण सहसंचालक डॉ.सतीश सातव,अंजली पालकर, योजना विभागाचे शिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले,गट शिक्षणाधिकारी सी.आर.शेख,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. योगेश सुरवसे, परभणीच्या मुख्याध्यापक संघाचे सचिव गणेश शिंदे,योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर, परभणी येथील शिक्षण तज्ञ महेश पाटील आदी उपस्थित होते.पुढे बोलताना महेश पालकर म्हणाले की, समाजाच्या तळागाळातील विद्यार्थी शिकावा यासाठी १०८ वर्षापासून योगेश्वरी शिक्षण संस्था निष्ठेने, समर्पित भावनेतून कार्य करीत असून हजारो विद्यार्थी विदेशात,देशात विविध स्तरावर कार्यरत आहेत. योगेश्वरी शिक्षण संस्थेने तारांगण प्रकल्पाचा केलेली निर्मिती ही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठीची मोठी उपलब्धी असून यातूनच विज्ञानाचा प्रचार व प्रसार होईल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.शिक्षण उपसंचालक प्रकाश मुकूंद म्हणाले की, योगेश्वरी शिक्षण संस्थेला स्वातंत्र्यपूर्व काळाचा इतिहास असून ही संस्था विद्यार्थी घडविण्याचे केंद्र असून देशाचे वैभव उभे करण्याचे काम या संस्थेतून होते संस्काराचे पोषण करण्यासाठी योगेश्वरी शिक्षण संस्थेसारख्या संस्थांची गरज असून विश्वात होणारे बदल पोहंचविण्याचे काम अशाच संस्थांच्या माध्यमातून होऊ शकते असेही ते म्हणाले. शिक्षण उपसंचालक गणपत मोरे म्हणु काळात मातृभाषेतून शिक्षण देण्याच्या उद्दिष्टाने स्थापन झालेल्या योगेश्वरी शिक्षण संस्थेने परंपरा जपत विज्ञान आणि संस्कृती यांचा वारसा जपला आहे विद्यार्थ्यांत गुणवत्ता निर्माण करण्याचे काम होते.महेश पाटील म्हणाले की विद्यार्थ्यांना आधार वाटणारी योगेश्वरी शिक्षण संस्था सर्वोत्तम आणि दिशादायी संस्था आहे. अध्यक्षीय समारोप करताना चंद्रशेखर बर्दापूरकर म्हणाले की,योगेश्वरी शिक्षण संस्था ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असून संस्थेचे मार्गदर्शक डॉ.सुरेश खुरसाळे यांनी केलेले दिशादायी कार्य, अविश्रांत परिश्रम,योग्य निर्णय, सर्वांचे सहकार्य यातूनच संस्थेचे विकासात्मक कार्य पुढे जात असल्याचे म्हणाले. मान्यवरांचे स्वागत योगेश्वरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, संचालक, विविध विभागांचे प्रमुख यांच्या वतीने करण्यात आले.

तारांगण प्रकल्प, हैदराबाद मुक्ती संग्राम केंद्र याची पाहणी पाहुण्यांनी केली

कार्यक्रमाच्या प्रास्तविकात उपाध्यक्ष जी.बी.व्यास यांनी संस्थेचा पूर्व इतिहास व आगामी ध्येय धोरणे सांगितली. कार्यक्रमाचे संचालन प्रा.डॉ.संपदा कुलकर्णी यांनी तर उपस्थितांचे आभार सचिव कमलाकर चौसाळकर यांनी मानले. यावेळी विविध ठिकाणाहून आलेले शिक्षक, शिक्षिका, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान ६ वरून...

जागतिक महिला दिनानिमित्ताने

संबंधित संदेशाद्वारे जनजागृती करण्यात येत आहे.

८ मार्च रोजी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये विशेष महिला सभेचे आयोजन केले आहे.सदर दिवशी ग्रामपंचायतीमध्ये पाणी, स्वच्छता व आरोग्य संबंधित कार्यक्रमाच्या अंमलबजावणी दरम्यान सद्यस्थितीत येणाऱ्या अडी अडचणी बाबत चर्चा विनिमय करण्यात येणार आहे.

सर्व तालुकास्तरावर सत्कार सोहळा आयोजित करणे , ग्रामस्तरावर पाणी, स्वच्छता व आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या स्वच्छता कामगार महिला, स्वच्छतेच्या मालमत्तेचे परिचालन, देखभाल व दुरुस्ती संबंधित सुयोग्य व्यवस्थापन करणारे महिला नेतृत्व, किशोरवयीन चॅम्पियन, क्षेत्रीय तपासणी संचाच्या सहाय्याने पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण करणाऱ्या महिला इ.महिलांचा तालुकास्तरावर सत्कार सोहळा आयोजित केलेला आहे.तालुका स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यशाळेत महिला आरोग्य अधिकाऱ्यांचे महिलांच्या आरोग्याविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे.यावेळी महिलांचा विशेष सन्मानित करण्यात येणार आहे.सदर विशेष सत्कार हा पाणी व स्वच्छतेचे व्यवस्थापन करणारे स्वयंसेवी गट, नेते, किशोरवयीन चॅम्पियन, पाणी गुणवत्ता तपासणी तसेच देखभाल दुरुस्ती करणाऱ्या महिला (एफटीके किट वापरून) आणि वॉशच्या कार्यात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या सर्व व्यक्तींचा समावेश करण्यात आला असल्याचेही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले आहे.

कदम सर यांची शैक्षणिक

करत असतो असे मार्गदर्शन केले.आदर्श शाळा जरेवाडीच्या प्रांगणात दि.३ मार्च २०२५ सोमवार रोजी सेवापूर्ती गौरव सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला.यावेळी पिंपळवंडी-अंमळनेर,डोंगरकिन्ही परिसरातील सर्व आजी- माजी मुख्याध्यापक,सर्व शिक्षक बंधू- भगिनी,गोपीनाथ मुंडे पाटोदा तालुका शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष,सचिव,उपाध्यक्ष,संचालक परिसरातील आजी- माजी सरपंच, उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य, पत्रकार,शालेय समिती व्यवस्थापन समिती,परिसरातील ग्रामस्थ,कदम कुटुंबीयांचे आप्तेष्ट,नातेवाईक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

घरकूलांचे प्रश्न तात्काळ

असल्याने त्या ठिकाणी सर्प,विंचू अशा सरपटणार्या प्राण्या पासून मनूष्य जिव तास धोका होऊ शकतो त्या मूळे आझाद क्रांती सेना प्रमूख राजेश घोडे यांच्या नेतृत्वाखाली गटविकास अधिकारी यांना माजलगावातील संपुर्ण गावाचे हप्ते वर्ग तात्काळ करण्यासाठी निवेदन देण्यात आले आहे.याप्रसंगी आझाद क्रांती सेना माजलगाव तालुका प्रमुख अशोक ढगे, जेष्ठ नेते किसन भिसे,मनूरचे ग्रा.प.सदस्य नरहरी क्षिरसागर,विद्यार्थी आघाडी अध्यक्ष गोपाळ गवळी,फूलेपिंपळगावचे माजी सरपंच हमिद पठाण,सांडसचिंचोलिचे नारायण शेजूळ,कैलास गायकवाड,संदिप भिसे,राहूल गायकवाड,बाळु हिवाळे,सांडस चिंचोली शाखाध्यक्ष संजय गायकवाड, वैभव चांदणे,नाना थोरात,करण वारे, या सह असंख्य लाभधारक उपस्थित होते.

युवा प्रशिक्षणार्थींना कायम सेवेत

येथील जिल्हा परिषद केंद्रीय शाळेच्या दिंद्रुड केंद्रातील एकूण चौदा शाळेच्या वतीने मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी शिक्षकांचा सन्मान समारंभ कार्यक्रम येथील जिल्हा परिषद शिवाजीनगर शाळेत काल (दि.०५ मार्च) बुधवारी संपन्न झाला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून केंद्रप्रमुख अमृत कुलकर्णी तर प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार तथा देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खाडेकर, महाराष्ट्र पत्रकार संघ जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश काशीद, शालेय व्य. समिती अध्यक्ष दादासाहेब वकरे, पत्रकार संतोष स्वामी, नवनाथ कांबळे, केंद्रीय मुख्याध्यापक वशिष्ठ मुंडे, मंचक सोळंके आदींची उपस्थिती होती. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चालू केलेल्या मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी शिक्षकांचा सहा महिन्यांचा कालावधी संपन्न झाल्यामुळे त्यांना निरोप न देता सपत्नीक सन्मान समारंभ आयोजित करण्यात आला. या शिक्षकांमध्ये मनीषा डोंगरे, सारिका गायकवाड, राधा लगड, सुरज्जा फपाळ, स्वाती लोखंडे, रूपाली काशीद, सोनाली गिते, गवळण फुगळर, अशोक देशमाने, गंगाराम बंडगर, शिवाजी ठोंबरे, रामेश्वर खाडे, निलेश जाधव यांचा समावेश आहे. त्यांना सन्मानपत्र, शाल, पुष्पहार, गुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. तर महिला प्रशिक्षणार्थींना साडीचोळी देऊन गौरविण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या ग्रामीण बीड जिल्हा उपाध्यक्षपदी प्रकाश काशीद यांची निवड झाल्याबद्दल त्यांचाही सन्मान यावेळी करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना अनेक प्रशिक्षणार्थी शिक्षिकांना गहिवरून आले. माहेरातून परत जाताना मुलींना जसे दुःख होते, तशीच काहीशी अवस्था आमची झाली आहे अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. जिल्हा परिषद शाळेतील चिमुकल्या मुलांना लावलेली माया व त्यांनी आम्हाला दिलेले प्रेम आम्ही कधीच विसरू शकत नाही. आम्ही उद्या आमच्या शाळेत नसणार आहोत याची हुरहुर मनाला लागेल अशी भावनाही जड अंतकरणाने अनेकांनी व्यक्त केली. प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांची कमतरता असल्याने या प्रशिक्षणार्थींची निवड झाल्याने शिक्षकांची उणीव बऱ्यापैकी भरून निघाली होती. रिकामे वर्ग या युवा प्रशिक्षणार्थींनी सांभाळत उत्तम प्रकारे ज्ञानदान करून मुलांना शिक्षणाबरोबर संस्कार दिले. एवढेच नव्हे तर त्यांनी तन-मन-धनाने जे ज्ञानदान केले याची दखल घेऊन त्यांना परत सेवेत सामावून घ्यावे अशी मागणी करण्यात आली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक मनोहर कटारे, सूत्रसंचलन सुमंत कटारे तर आभार मुख्याध्यापक पांडुरंग कटारे यांनी मानले. कार्यक्रमास केंद्रातील सर्व शिक्षक-शिक्षिकांसह पालकांची उपस्थिती होती.

परमेश्वर सातपुते यांनी

शाखा कराव्यात असे आवाहन केले.

व झालेल्या विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर खचून न जाता येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेऊन जोमाने कामाला लागावे असे सांगितले.

यावेळी महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका प्रमिलाताई माळी, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर, पाटोदा तालुका प्रमुख मुकूंद शिंदे, आष्टी तालुका प्रमुख सुभाष राऊत, शिरूर तालुका प्रमुख सोपान मोरे, महिला आघाडी पाटोदा तालुका प्रमुख प्रतिभाताई वनवे, युवासेना उपजिल्हा युवाधिकारी कृष्णा चौरे, युवासेना शिरूर तालुका युवाधिकारी साईनाथ ढाकणे, युवासेना आष्टी तालुका युवाधिकारी शिवप्रसाद जाधव, युवासेना पाटोदा तालुका युवाधिकारी अजिंक्य डोरले, शिवसेना उपतालुकाप्रमुख अक्षय साप्ते, आष्टी तालुका संघटक ज्ञानदेव मुटकुळे, शेतकरी सेनेचे तालुकाप्रमुख बिभिसेन बिसेन, युवा नेते आकाशजी कांकरिया, युवा नेते सोमनाथजी लवुळ सह शिवसेना, युवासेना, महिला आघाडचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

नाफेडच्या विक्रीमुळे सोयाबीनच्या भावात मोठी घसरण; नाफेडने किती विकले सोयाबीन?

हमीभावाने खेरदी केलेल्या सोयाबीनची विक्री नाफेडने बुधवार (ता.५)पासून सुरु केली. त्यामुळे देशातील सोयाबीनचे भाव पुन्हा सरासरी २०० रुपयांपर्यंत कमी झाले. नाफडने ज्या भावात सोयाबीन विकले त्याच भावात प्रक्रिया प्लांट्सनी सोयाबीनची खरेदी केली. त्यामुळे बाजारात सोयाबीनला केवळ ३ हजार ७०० ते ३ हजार ९०० रुपयांचा भाव मिळाला. आंतरराष्ट्रीय बाजारातील घाडमोडींचाही परिणाम होत असल्याचे अभ्यासकांनी सांगितले. देशात नाफेड आणि एनसीसीएफने जवळपास २० लाख टन सोयाबीन खरेदी केले. त्यापैकी महाराष्ट्रात ११ लाख २१ हजार टनांची खेरदी झाली. देशात चालू हंगामाच्या सुरुवातीपासूनच सोयाबीनचा भाव हमीभावापेक्षा कमी होता. त्यामुळे सरकारच्या हमीभावाने खेरदीला चांगला प्रतिसाद मिळाला होता.

सरकार खरेदी उतरले तेव्हा खुल्या बाजारात सोयाबीनचे भाव सुधारतील, असा अंदाज बांधला जात होता. पण सरकार जास्त दिवस सोयाबीनचा स्टॉक ठेवणार नाही, याची चर्चा बाजारात सुरु झाली आणि बाजाराला या खरेदीचा आधार मिळाला नाही. बाजारातील चर्चेप्रमाणे नाफेडची कृती घडत आहे. नाफेडने खरेदी बंद होऊन महीनाही होत नाही तोच बाजारात माल विक्रीचा निर्णय घेतला. नाफेड मध्य प्रदेशात ३ लाख टन सोयाबीन मार्च

महिन्यात विकणार, ही पहीली माहिती समोर आल्यानंतर सोयाबीन प्रोसेसर्स असोसिएशन ऑफ इंडिया अर्थात सोपाने दर पडतील असा धोका व्यक्त केला होता. सोपाचे म्हणणे आहे की, सरकारने किमान २०२५ च्या खरिपातील पेरणी होईपर्यंत सोयाबीन विकू नये. अन्यथा दर पडल्यास पेरणी कमी होऊ शकते. सरकारने आतापर्यंत मध्य प्रदेशातील सोयाबीन विकले नाही मात्र कर्नाटकात बुधवारी (ता.५) विक्री केली.

कर्नाटकात विक्री

कर्नाटकात नाफेडने केवळ १ हजार ६० टन सोयाबीन ई लिलावाद्वारे विकले. हुबळी आणि रामदुर्ग केंद्रावर ही विक्री झाली. हुबळी येथील केंद्रावर विक्रीत ४ हजार १६१ रुपये भाव मिळाला. तर रामदुर्ग केंद्रावर ४ हजार १५१ रुपये प्रतिक्विंटलचा भाव मिळाला.

बाजारावर परिणाम : नाफेडने विकलेले सोयाबीन केवळ १ हजार ६० टन होते. तसे पाहीले तर हा माल खूपच कमी आहे. मात्र नाफेडने विक्री सुरु केली हे सेंटीमेंट बाजारात पसरले. तसेच नाफेड इतरही राज्यांमध्ये विक्री सुरु करेल आणि बाजारात पुरवठा वाढेल या सेंटीमेंटचा बाजारावर परिणाम झाला. नाफेडने ज्या भावात सोयाबीन विकले त्याचदरम्यान प्रक्रिया प्लांट्सनीही आपले खरेदीचे भाव काढले होते. देशभरात आत प्रक्रिया प्लांट्सनी ४ हजार ५० ते ४ हजार १५० रुपयांच्या दरम्यान सोयाबीन खरेदी केले. त्यामुळे बाजारात सोयाबीनचे भाव ३ हजार ७०० ते ३ हजार ९०० रुपयांच्या दरम्यान सोयाबीन विकले गेले.

आतबट्ट्याची विक्री : सरकारने हमीभावाने म्हणजेच, ४ हजार ८९२ रुपये सोयाबीनचे खरेदी केली. मात्र हेच सोयाबीन सरकारने एका महिन्यात ७५० रुपये कमी भावात विक्रीला काढले. शेतकऱ्यांच्याही सोयाबीनची बाजारात आवक होत आहे. म्हणजे बाजारात माल येत नाही असे नाही. त्यामुळे याचा परिणाम खुल्या बाजारातील दरावर होणारच होता. सरकारने सोयाबीन विक्रीचे दर एवढे कमी केले नसते तर मार्केटही एवढे तुटले नसते, असे काही व्यापाऱ्यांनी सांगितले.

पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया आवश्यकच

जास्त उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांना पेरणीनंतरच नाही तर पेरणीच्या पुर्वीही योग्य ती काळजी घ्यावी लागते. पेरणीसाठी बियाणे जर हलक्या प्रतीचे आणि निकृष्ट असल्यास उत्पादन नाही पण पिकाचीही वाढ योग्य पध्दतीने होत नाही. पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करणे खूप गरजेचे आहे. कसे ते जाणून घेऊयात.

जाणून घ्या बीजप्रक्रियेचे फायदे : बीजप्रक्रियेमुळे अंकुरित बियाणे आणि रोपे यांचे माती तसेच बियाणेजन्य कीटक, रोगांपासून संरक्षण होते. बीजप्रक्रियेमुळे उगवण प्रक्रिया सुधारून उगवण टक्केवारी वाढवते. हे बियाणांची व्यवहार्यता आणि जोम वाढवून ते शेती किंवा शेती पद्धतीतील दोन सर्वात महत्वाचे घटक आहेत. पिके किंवा वनस्पतींची लवकर, एकसमान वाढ होते. कडधान्य पिकांमध्ये नोड्यूलेशन वाढते. हे पिकामध्ये माती आणि पर्णसंभारापेक्षा चांगले आहे.

जाणून घ्या बीजप्रक्रिया पद्धती : बियाण्यांवर ३ वेगवेगळ्या प्रकारे प्रक्रिया करता येते. सीड लेप, सीड ड्रेसिंग आणि सीड पेलेटिंग.

सीड ड्रेसिंग – सर्वात सामान्य पद्धत म्हणजे बियाणे ड्रेसिंग. या पद्धतीमध्ये बिया एकतर कोरड्या फॉर्म्युलेशनने तयार कराव्या किंवा ओल्या पद्धतीने स्लरी किंवा लिक्विड फॉर्म्युलेशनने तयार कराव्या लागतात. शेती आणि उद्योग या दोन्ही ठिकाणी ड्रेसिंग लागू करावे. या प्रक्रियेत बिया पॉलिथिनच्या शीटवर पसरून आवश्यक प्रमाणात रसायने बियाण्याच्या पृष्ठभागावर शिंपडून शेतकऱ्यांनी यांत्रिक पद्धतीने मिसळून घ्यावी.

बियाणे कोटिंग – सामान्यतः, हे प्रगत उपचार तंत्रज्ञानासह उद्योगांद्वारे करण्यात येते.

बियाणे पेलेटिंग – चव वाढवण्यासाठी बियांचा भौतिक आकार बदलण्यासाठी ही पद्धत वापरण्यात येते. या प्रक्रियेसाठी अत्याधुनिक बियाणे प्रक्रिया तंत्रज्ञान आवश्यक आहे. त्यामुळे ते सर्वात महागडे ॲप्लिकेशन मानले जाते.

गिलक्याच्या सर्वोत्तम प्रजाती लावा अन् उन्हाळ्यात घ्या भरघोस उत्पादन

महाराष्ट्रात भाजीपाला लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या अधिक असून, ते नियमित आलटून-पालटून भाजीपाला पिके घेत असतात. यात शेतकरी अनेक वेलवर्गीय फळभाज्यांची देखील लागवड करतात. यात गिलके (घोसाळे) लागवड ही उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये प्रभावी मानली जाते. लागवडीनंतर साधारणपणे ७० ते ८० दिवसांमध्ये फळ तोडणीला येते. त्यामुळे आत्ता लागवड केल्यास ऐन मे महिन्यात भर उन्हाळ्यात तुमचे पीक काढणीला येईल. ज्यातून उन्हाळ्यात मे आणि जून महिन्यात भाजीपाल्याचे गगनाला भिडलेले असतात. त्यामुळे उन्हाळी गिलके लागवडीतून तुम्हांला मोठी आर्थिक कमाई होऊ शकते.

गिलके लागवड ही प्रामुख्याने रोपे आणि आणि टोकन अशा दोन्ही पद्धतीने केली जाते. त्यामुळे तुमच्याकडे काही प्रमाणात पाणी उपलब्ध असल्यास, तुम्ही ठिबक पद्धतीने गिलक्याचे पीक घेऊ शकतात. गिलक्यामध्ये कॅल्शिअम, फॉस्फरस आणि प्रथिनांचे प्रमाण अधिक असते. ज्यामुळे त्याला बाजारात नेहमीच मोठी मागणी असते. शेतकरी उन्हाळी गिलके लागवड सुविधा उपलब्ध असल्यास, पॉलीहाऊसमध्ये प्रभावीपणे घेऊ शकतात. उन्हाळी गिलके लागवडीसाठी १५ फेब्रुवारी ते मार्चचा पहिला आठवडा हा उत्तम काळ मानला जातो.

या आहेत प्रमुख पाच प्रजाती :

महिको (पल्लवी) वाण – महिको (पल्लवी) ही उन्हाळ्याच्या हंगामामध्ये अधिक उत्पादन देण्यास सर्वोत्तम वाण मानले गेले आहे. या जातीचा रंग हिरवा असतो. या वाणाच्या एका गिलक्याचे वजन हे १५० ते २०० ग्रॅम इतके असते. विशेष म्हणजे हे वाण ४० ते ४५ दिवसांमध्ये खूपच कमी कालावधीमध्ये तोडणीला येते.

नामधारी एनएस ४७४ वाण – नामधारी एनएस ४७४ या वाणाचा रंग गडद हिरवा असतो. याची लांबी ही साधारणपणे ४० ते ४५ सेमी इतकी असते. या वाणाच्या एका गिलक्याचे वजन २०० ते २५० ग्रॅम असते. या वाणाची देखील पहिली तोडणी ४० ते ४५ दिवसांत सुरु होते.

व्हीएनआर (आरती) – व्हीएनआर (आरती) या गिलक्याच्या वाणाचा रंग हा अधिक हिरवा असतो. याची लांबी ही जवळपास २५ ते ३० सेमी इतकी असते. तर याचे वजन हे २०० ते २२५ ग्रॅम इतके असते. या वाणाची पहिली तोडणी ५० ते ५५ दिवसांमध्ये सुरु होते.इरीस मॅक्स ००१ – इरीस मॅक्स ००१ हे गिलक्याचे सर्वोत्तम वाण मानले जाते. त्याची लांबी ही ३० ते ३५ सेमी इतकी असते. तर एका गिलक्याचे वजन हे साधारणपणे २०० ते २५० ग्रॅम इतके असते. हे वाण कमीत कमी ४५ ते ५० दिवसांमध्ये तोडणीला येते.

नुनहेम्स युएस ६००१ – गिलक्याचे अधिक उत्पादन देणारे वाण म्हणून नुनहेम्स युएस ६००१ हे वाण विशेष प्रसिद्ध आहे. याची लांबी ही ४५ ते ५० सेमी इतकी असते. तर एका गिलक्याचे वजन हे १६० ग्रॅम ते २१० ग्रॅम इतके असते. याशिवाय हे वाण ५५ ते ६० दिवसांमध्ये तोडणीला येते.

शेवगा लागवडीचे तंत्र आणि उत्पादन

शेवग्याच्या शेंगांना बाजारपेठेत कायमस्वरूपी मागणी आहे. हलक्या जमिनीत, कोणत्याही हवामानात, पावसाच्या पाण्यावर शेवग्याची लागवड करता येते.

हवामान व जमीन : शेवगा कोणत्याही हवामानात वाढू शकतो. शेवग्याची लागवड अत्यंत हलक्या ते भारी जमिनीत करता येते. जेथे पावसाचे प्रमाण चांगले आहे. अशा ठिकाणी डोंगरउतारावरील हलक्या जमिनीमध्ये सुद्धा शेवगा चांगला येतो.

सुधारित जाती : कोइमतूर-१, कोइमतूर-२, पी.के.एम.-१ आणि पी.के.एम.-२ या जाती कोइमतूर येथील तमिळनाडू कृषी विद्यापीठाने प्रसारित केल्या आहेत. या जातीची झाडे ५ ते ६ मीटर उंच वाढतात, झाडास १६ ते २२ फांद्या असतात. पी.के.एम.-२ ही जात लागवडीपासून ६-७ महिन्यात शेंगा देणारी आहे. या वाणाच्या शेंगा रुचकर व स्वादिष्ट आहेत. शेंगा ५-६० सें.मी. लांब व गर्द हिरव्या रंगाच्या असल्यामुळे या शेंगांना चांगला बाजारभाव मिळतो.

लागवड : पावसाळ्यापूर्वी ६० सेमी लांब, रुंद आणि खोल खोदलेल्या खड्ड्यात चांगली माती, कुजलेले शेणखत १ घमेले, सुफला १५१५१५:: (२५० ग्रॅम) आणि १० टक्के लिन्डेन पावडर (५० ग्रॅम) टाकून खड्डा भरून घ्यावा.

लागवड करताना दोन झाडांतील व ओळींतील अंतर ३ मीटर ठेवावे. शेताच्या बांधावर लागवडीसाठी ३ मीटर अंतर ठेवावे.

लागवडीचा कालावधी :जून ते जुलैमध्ये पावसानंतर वातावरणात अनुकूल बदल होतो. हवेतील आर्द्रता वाढते. अशी हवा रोपे रुजण्यास अनुकूल असते. तेव्हा याच वेळी लागवड करावी.

फाटे कलम अथवा रोपे लावल्यावर त्याच्या जवळील माती पायाने चांगली दाबावी व हातपाणी द्यावे. लागवडीनंतर ६ ते ७ महिने गरज पडेल तेव्हा पाणी देऊन किंवा ठिबक सींचनाने झाडे जगवावीत.

आंतरपीक : आंबा, चिकू, लिंबू, जांभूळ, आवळा, चिंच व सीताफळ बागांमध्ये पहिले ५-६ वर्ष आंतरपीक म्हणून शेवगा घेता येतो. शेवग्याची लागवड सलग पद्धतीने केल्यास त्यामध्ये खरिपात सोयाबीन, मूग, उडीद, हुलगा अशा कडधान्यांची व रब्बी हंगामात हरभऱ्याची लागवड केल्यास जमिनीची सुपीकता वाढून आंतरपिकाचे उत्पादन मिळते. मध्यम ते भारी जमिनीत शेवग्याची लागवड करावयाची असल्यास व पाण्याची उपलब्धता असेल तर नगदी पिकेसुद्धा घेणे फायद्याचे ठरते.

लागवडीनंतर घ्यावयाची काळजी : झाडाची आळी खुरपून स्वच्छ करावी. तसेच दोन झाडांच्या ओळीत वखरणी करावी. म्हणजे तणांचा उपद्रव होणार नाही. प्रत्येक झाडास १० किलो शेणखत, ७५ ग्रॅम नत्र (१६५ ग्रॅम युरिया), ५० ग्रॅम स्फुरद (३१२ ग्रॅम सुपर फॉस्फेट) व ७५ किलो पालाश (१२० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश) द्यावे.

शेवग्याची झाडे झपाट्याने वाढणारे असल्यामुळे झाडांना आकार देणे आवश्यक आहे. व्यवस्थित आकार दिला नाही तर झाड उंच वाढते. त्यामुळे शेंगा काढणी अवघड जाते.

शेवग्याची छाटणी : लागवडीनंतर साधारणपणे ३ ते ४ महिन्यांनंतर व झाडांची उंची ३ ते ४ फूट झाल्यानंतर वरून अर्धा ते एक फूट शेंडा छाटावा. त्यामुळे झाडांची उंची मर्यादित राहून शेंगा देणाऱ्या फांद्या ३ ते ४ फुटाच्या खाली आल्याने शेंगा काढणीस सोपे जाते. लागवडीपासून ६ ते ७ महिन्यात शेंगा तोडणीस येतात. त्यानंतर ३ ते ४ महिने शेंगाचे उत्पादन मिळते. एक पीक झाल्यानंतर पुन्हा झाडांची छाटणी करुन झाडास योग्य तो आकार द्यावा. त्यासाठी झाडाचा मुख्य बुंधा ३ ते ४ फूट ठेवून बाजूच्या फांद्या साधारणतः १ ते २ फूट ठेवाव्यात.

पीकसंरक्षण : या पिकावर रोगाचा प्रादुर्भाव फारसा दिसत नाही. परंतु, काही वेळा जून ते ऑगस्ट महिन्यात पानांची गळ होते. खोड व फांद्यांवर ठिपके किंवा चट्टे दिसतात. रोपे मरतात. या रोगांच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डाझिम (१० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात) किंवा बोर्डोमिश्रण (०.२५%) फवारावे.

काढणी व उत्पादन : लागवडीपासून सुमारे ६ ते ७ महिन्यांनी शेंगा मिळू लागतात. पूर्ण वाढीच्या आणि ज्यांचा पीळ पूर्ण उलगडला आहे अशा शेंगा लांबीनुसार जुळवून घ्याव्यात. प्लॅस्टिक कागदाच्या गोणपाटात गुंडाळल्यास शेंगाचा तजेला जास्त काळ टिकून राहतो. एका वर्षानंतर दरवर्षी एका चांगल्या झाडापासून सुमारे २५ ते ५० किलो शेंगा मिळतात.

दिन विशेष

जागतिक दिवस:
स्वांतत्र्य दिन : घाना.
अलामो दिन : टेक्सास.

महत्वाच्या घटना

१८४० : बाल्टिमोर कॉलेज ऑफ डेंटल सर्जरी हे पहिले दंतवैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले
१९०२ : रेआल माद्रिद फुटबॉल क्लब ची स्थापना झाली.
१९१५ : राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि रवींद्रनाथ टागोर शांतीनिकेतन येथे पहिल्यांदा भेटले.
१९२१ : पोतुर्गाली कम्युनिस्ट पार्टी ची स्थापना करण्यात आली.
१९४० : रशिया व फिनलंड मधे शस्त्रसंधी झाली.
१९५३ : मराठीतील श्रेष्ठ नाटककार आचार्य अत्रे यांनी 'श्यामची आई' हा चित्रपट पडद्यावर आणला.
१९५७ : घाना देशाचा स्वातंत्र्य दिन.
१९६४ : कॅशियस क्ले यांनी मुहम्मद अली ये नाव धारण केले.
१९७१ : भारतीय क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी वेस्ट इंडीज विरुद्ध पहिला कसोटी सामना खेळला.
१९७५ : इराण व इराक यांच्यात सीमाप्रश्नावर संधी झाली.
१९८३ : आजच्या दिवशी १९८३ ला युनाटेड स्टेट ने पहिल्या फुटबॉल लीग ची स्थापना केली.
१९९० : भारताने इंदिरा गांधी गोल्ड कप हॉकी टूर्नामेंट चा खिताब आपल्या नावावर केला.
१९९१ : भारताचे माजी पंतप्रधान चंद्रशेखर राव यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.
१९९२ : 'मायकेल अँजेलो' नावाचा संगणक विषाणू पसरण्यास सुरूवात झाली.
१९९८ : विख्यात गझलगायक जगजितसिंग यांना मध्यप्रदेश सरकारतर्फे दिला जाणारा 'लता मंगेशकर पुरस्कार' जाहीर
१९९९ : जगप्रसिद्ध खजुराहो मंदिर समुहाच्या सहस्राब्दी सोहळ्याचे राष्ट्रपती के. आर. नारायणन यांच्या हस्ते उद्घाटन
२००० : शहर निर्वाह भत्ता, महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता म्हणून मिळणारी रक्कम करपात्र असल्याचे सर्वोच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब
२००५ : देशातील पहिला अणुउर्जा प्रकल्प तारापूर येथे सुरु झाला.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७५ : मायकेल अँजेलो – इटालियन शिल्पकार आणि चित्रकार (मृत्यू: १८ फेब्रुवारी १५६४)
१५०८ : मुघल सम्राट अकबर जलालुद्दीन चे वडील हुमायु चा जन्म.
१७८७ : जर्मनीचे भौतिकशास्त्रज्ञ जोसेफ वॉन फ्रॉनहोफर यांचा जन्म.
१८९९ : चरित्रकार आणि संपादक शि. ल. करंदीकर यांचा जन्म.
१९१५ : बोहरी धर्मगुरू सैयदना मोहम्मद बर्हानुद्दिन यांचा जन्म.
१९३३ : भारतीय चित्रपट अभिनेत्री कृष्णा कुमारी यांचा जन्म.
१९४९ : शौकत अजिझ – पाकिस्तानी राजकारणी
१९५७ : अशोक पटेल – भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९६५ : देवकी पंडीत – गायिका
१९८६ : प्रसिद्ध भारतीय गायक अंकित तिवारी यांचा जन्म.
१९९७ : भारतीय चित्रपट अभिनेत्री जानव्ही कपूर चा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९४७ : ब्रिटीश भूराजनीतिज्ञ आणि राजकारणी मकिंडर हॉलफोर्ड जॉन यांचे निधन.
१९६६ : रामपूर चे नवाब रझा अली खान बहदूर यांचे निधन.
१९६७ : कर्तबगार प्रशासक स. गो. बर्वे यांचे निधन.
१९६८ : साहित्यिक नारायण गोविंद चापेकर उर्फ ना. गो. चापेकर यांचे निधन.
१९७३ : नोबेल पारितोषिक विजेत्या अमेरिकन लेखिका पर्ल एस. बक यांचे निधन. (जन्म: २६ जून १८९२)
१९८१ : गो. रा. परांजपे – मराठीतील आघाडीचे विज्ञान प्रसारक, नामवंत शास्त्रज्ञ, 'रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स'चे पहिले भारतीय प्राचार्य
१९८२ : रामभाऊ म्हाळगी – राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक, जनसंघ या राजकीय पक्षाचे महाराष्ट्राचे पहिले सरचिटणीस आणि विधानसभेतील पहिले आमदार, तसेच भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्राचे पहिले प्रादेशिक अध्यक्ष
१९९२ : प्रसिध्द कादंबरीकार रणजित देसाई – कर्तबगार प्रशासक स.गो.बर्वे.
१९९५ : दक्षिण भारतात हिंदी भाषेचे प्रचारक मोटूरि सत्यनारायण यांचे निधन.
१९९९ : सतीश वागळे – हिन्दी आणि मराठी चित्रपट निर्माते
२००० : नारायण काशिनाथ लेले – कृष्ण यजुर्वेद शाखेतील वेदमूर्ती
२००६ : भारतीय चित्रपट दिग्दर्शक के शंकर यांचे निधन.

असे थांबवा शेततळ्यातील बाष्पीभवन

शाश्वत पाण्याचे स्त्रोत हवेत म्हणून शेततळे बांधले, पण बाष्पीभवनामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होतो. पाणीटंचाईच्या काळात पिकांना आवश्यक पाणी देण्याकरिता बाष्पीभवन टाळायला हवे. असे लक्षात आले आहे की तळी, धरणे किंवा कालवे यांसारख्या जलसाठ्यांतून वर्षाला साधारणपणे एकूण ४० ते ४२ टक्के पाण्याचे बाष्पीभवन होते. जेवढे तापमान जास्त असेल तेवढे बाष्पीभवनाचे प्रमाण जास्त असते.

बाष्पीभवन टाळायचे उपाय : शेततळ्याचा पृष्ठभाग लहान ठेवा – द्रव्याचे आकारमान जेवढे जास्त, तेवढा बाष्पीभवनचा दर वाढत जातो. अधिक लांबी-रुंदी असणारे शेततळे बांधल्यास पाण्याचा हवेशी संपर्क येणारा भाग वाढतो. त्यामुळे साठविलेल्या पाण्याचे अधिक प्रमाणात बाष्पीभवन होते. म्हणूनच अधिक खोली असणारे शेततळे बांधावे.

कुंपण – शेततळ्याच्या बाजूने उंच व दाट झाडांचे कुंपण करावे. असे केल्यास वाऱ्याचे तापमान कमी होऊन उष्ण वाऱ्याद्वारे होणारे बाष्पीभवन कमी होत. सागरगोटा, शिकेकाई, निर्गुडी, करवंद, खैर, जंगली गुलाब, सुबाभूळ, घाणेरी, बांबू, बोगनवेल, एरंड आदी वनस्पतींचा उपयोग करता येतो.

भिंत उभारणे – वर सांगितल्या प्रमाणे जैविक कुपन उभारणे शक्य नसल्यास शेततळ्याच्या आजूबाजूने तीन मीटर उंचीची भिंत बांधता येऊ शकते. उपलब्ध माती व मुरुमाचा वापर करून तात्पुरती भिंत उभारल्यास हरकत नाही. भिंतीची उंची शेततळ्यापेक्षा जास्त असावी. तेलांचा वापर – निंबोळी किंवा एरंडी या वनस्पतिजन्य

बीड पंचायत समितीच्या वतीने लिंबागणेश येथे ग्राम दरबार

शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा –डॉ.विजय देशमुख

लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड पंचायत समितीच्या व ग्रामपंचायत लिंबागणेश यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि.(०५) बुधवार रोजी लिंबागणेश येथे 'एक दिवस गावकऱ्यांसोबत ' ग्राम दरबार उपक्रम अंतर्गत घेण्यात आला.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद बीड डॉ.विजय देशमुख तर प्रमुख उपस्थिती म्हणून पशुवैद्यकीय अधिकारी लिंबागणेश डॉ.रमण देशपांडे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.सुनिल यादव, विस्तार अधिकारी पंचायत समिती बीड येळंबकर, कृषी विस्तार अधिकारी चंद्रकांत नागरगोजे, कृषी सहायक वाघ,पेजगुडे,उमेद अभियानच्या प्रियंका जोगदंड, ज्योत्स्ना वखरे, आरोग्य सेवक वीर यांची उपस्थिती होती. ग्रामपंचायतच्या वतीने सरपंच बालासाहेब जाधव, ग्रामविकास अधिकारी वीर , सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ आणि ग्रामपंचायत सदस्यांनी पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर यांनी केले तर डॉ.गणेश ढवळे यांनी आभार मानले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी

निर्मळ, दामोदर थोरात, रमेश गायकवाड, समीर शेख, दादा गायकवाड, अँड.गणेश वाणी, सुरेश निर्मळ, सय्यद शाकेर, माणिक कांबळे,जीवन मुळे, सुखदेव वाणी, हरिओम क्षीरसागर आदि ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती .

भारतातील ६२ टक्के लोकसंख्या आजही ग्रामीण भागात राहते. ग्रामीण भागातील पुनरुत्थानासाठी शासनामार्फत विविध उपक्रम राबविले गेले. महात्मा गांधींच्या स्वप्नातील खेडी ही स्वयंपूर्ण ,स्वयंशासित असावीत अशी सर्व ग्रामस्थांची अपेक्षा असते शासनाच्या विविध योजना उपक्रम व सेवा ग्रामस्थांच्या दारी पोहोचवणे हे सुप्रशासनाचे लक्षण आहे. याच मुद्यावर आधारित ग्रामीण भागात काम करणाऱ्या सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांमार्फत प्रत्येक गावामध्ये विविध सेवा ठराविक कालावधीत पोहचविण्याच्या अनुषंगाने 'एक दिवस गावक-यांसोबत (ग्राम दरबार)हा नाविन्यपूर्ण उपक्रम छत्रपती संभाजी नगर विभागात राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने जिल्हा परिषद बीड व बीड पंचायत समिती आणि ग्रामपंचायत कार्यालय लिंबागणेश यांच्या संयुक्त विद्यमाने 'एक दिवस गावकऱ्यांसोबत' हा ग्राम दरबार उपक्रम राबवण्यात आला. विविध विभागातील आधिका-यांनी उपस्थित राहून ग्रामस्थांशी संवाद साधला. तसेच त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. पंचायत समिती अंतर्गत व शासनाच्या सर्व कल्याणकारी योजनांचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद बीड डॉ.विजय देशमुख यांनी केले. शासनाच्या विविध विकास योजनेविषयी पंचायत समितीमध्ये सर्व उपक्रम यांनी मार्गदर्शन मार्गदर्शन केले. शासनाच्या विविध योजना, उपक्रम, धोरण आणि सेवा ग्रामस्थांच्या दारी पोचवण्याचा उद्देशाने या लोकोपयोगी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ग्रामपंचायत, शिक्षण ,कृषी, महिला व बालकल्याण ,आरोग्य पशुसंवर्धन, समाज कल्याण, पाणीपुरवठा ,स्वच्छता ,सिंचन व जलसंधारण या संदर्भातील अडचणींवर सविस्तर चर्चा केली. तसेच यावर तोडगा काढण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

जयभिम महोत्सव समितीकडून चेक सुपूर्द

समितीकडून पैशाचा योग्य विनियोग

बीड । प्रतिनिधी

अवघ्या राज्याला आदर्श निर्माण करुन देईल. असा जयभिम महोत्सव बीडमध्ये साजरा केला जातो. स्वबळावर साजरा होणारा जयभिम महोत्सव म्हणून नावारूपाला आला आहे. त्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे प्रमुख असताना शिल्लक राहिलेले सहा लाख रुपये राष्ट्रीयकृत बँकेत फिक्स डिपॉझिट म्हणून ठेवण्यात आले होते. त्या रकमेसह मिळालेले व्याज असे एकूण ८ लाख ५० हजार रुपये बुद्धशृष्टी शुशोभिकरण समितीकडे सुपूर्द करण्यात आले आहेत.

बीड शहरातील रिपाइं मध्यवर्ती कार्यालयात, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या उपस्थितीमध्ये बुद्धशृष्टी शुशोभिकरण समितीकडे सदरील रकमेचा चेक सुपूर्द करण्यात आला आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती समिती तत्कालीन समिती प्रमुख असलेले शितलकुमार सुकाळे यांनी त्यांच्या कार्यकाळात शिल्लक राहिलेले सहा लाख रुपये राष्ट्रीयकृत बँकेत फिक्स डिपॉझिट म्हणून जमा करुन ठेवले होते. सर्वानुमते शिल्लक रकमेचा उपयोग बुद्धसृष्टी सुशोभीकरणासाठी खर्च करण्याचे ठरले. त्या अनुषंगाने शितलकुमार सुकाळे सर यांनी फिक्स डिपॉझिटचे सहा लाख आणि त्यावरील व्याज यासह आठ लाख पन्नास हजार रुपये समितीकडे सुपूर्त केले. शितलकुमार सुकाळे सर यांनी शिल्लक रक्कम व्यवस्थित जतन केल्यामुळे आणि रकमेचा विनियोग करण्याचा निर्णय घेताच तात्काळ ८५०००/- चा चेक समितीकडे सुपूर्त केल्याबद्दल शितलकुमार सुकाळे सर यांचा सहृदय सत्कार करण्यात आला.यावेळी राजुजी जोगदंड अजयजी सवाई गौतम चोपडे संतोष जाधव नाना मस्के अरुणा आठवले बंडू निसर्गन विजय चोपडे बाळासाहेब डोळस महादेव इनकर सर,संजय हनवते आदी उपस्थित होते.

पाटोदा पंचायत व महसुल प्रशासनाचा कारभार ढेपाळला

कार्यालयात दलालांचा सुळसुळाट वाढला

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील सर्व प्रशासनाचा कारभार ढेपाळला असुन सर्वच कार्यालयात दलालाचा सुळसुळाट वाढला असल्यामुळे महसुली, पंचायत समिती,कृषी पशुसंवर्धन, पोलीस स्टेशनमध्ये ही दलालाची कीड लागली असुन अभ्यागतांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

पाटोदा पंचायत समितीच्या कार्यालयात येणाऱ्या शेतकरी ,अनेक योजनांच्या लाभार्थ्यांना कामे करून देतो म्हणून काही दलाल त्यांची आर्थिक लूट करीत आहे. अशा दलालाचा पाय बंद करावा, अशी मागणी सर्व सामान्य नागरिकांमधून केली जात आहे.शासनाकडून मनरेगा अंतर्गत सिंचन विहीर, पंतप्रधान आवास घरकुल,रमाई घरकुल योजना कृषी व पशुसंवर्धन, सामाजिक वनीकरण या विभागात सरकारी विविध जनहिताच्या योजना सुरू आहेत. विविध योजनेचा लाभ मिळवून देतो म्हणून शासनाच्या विविध योजनेतील कामे करून देण्याच्या नावाखाली शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांची लूट करण्यात येत आहे. शासकीय कार्यालयात दलालाची सुळसुळाट वाढल्याने पंचायत समितीच्या मनरेगा अंतर्गत होणारी कामे टक्केवारी दिल्याशिवाय होतच नाहीत.पाटोदा पंचायत समिती कार्यालयातील प्रत्येक टेबलचा भाव ठरलेला असल्याने दलाल मागणी करीत आहे. अशी पंचायत समिती आवरात अभ्यागतांत चर्चा एकावयास येत आहे. शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी हे आपला हिस्सा ठेवत दलालांना हाताशी धरून मदत करीत असल्याने सर्वसामान्य नागरिक शेतकऱ्यांना लुटीचा धंदा हा बिनबोट सुरू आहे. सध्या शासनाच्या विविध योजना या ऑनलाइन मिळवण्याची प्रक्रियाआहे. पण एजंट हे नागरिकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना कागदपत्र मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडून पैसे उकळत आहेत. पंचायत समिती कार्यालयातील दलालाना रोखण्याची मागणी तालुक्यातील नागरिकाकडून होत आहे.पाटोदा पंचायत समितीच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना आपला हक्काचा माणुस मिळाला असल्याने रोजगार सेवकांची नियुक्ती यासाठीच झाली आहे काय अशी शंका व्यक्त होत आहे.काही कर्मचारी व अधिकारी हे पाटोदा येथिल कार्यालयात येतच नाहीत त्यांचा कारभार हा बीड येथुनच हाकला जात आहे. पाटोदा तालुक्यातील अनेक ग्रामपंचायत ने आपले आराखडे पंचायत समितीला सादर केले आहेत.वयक्तीक लाभार्थ्यांना विहीर किंवा गायगोठे, शेततळे देताना जुनेच नवे म्हणुन दाखवले जात असल्याने.ही सगळी करामत ग्रामरोजगार सेवक करत असल्याचेही निदर्शनास येत आहे.मात्र तुम भी चुप व मै भी चुप असे पाटोदा तालुक्यात चालले आहे.तर महसूल विभागाशी संबंधित तहसील कार्यालय व विभागिय कार्यालयात ही दलालांचा सुळसुळाट वाढला असल्यामुळे महसुली कर्मचाऱ्यांची पाटोदा येथे अनेक जागा रिक्त असल्याने असल्याने कार्यालयात खाजगी व्यक्तींचा वावर सर्रासपणे वाढला आहे.तसेच हे कार्यालय हे पहिल्या मजल्यावर असल्याने निराधार योजनेच्या वृध्द लोकांसाठी हे त्रासदायक ठरत आहे.तर तहसिलदार कार्यालयातच अनेक बैठकांचे सत्र चालु असल्याने सर्वसामान्य माणसाला टाकळतच रहावे लागते.तर पुरवठा विभाग म्हणजे लुटीचे एक कुरण आहे .सततच सर्व्हर बंद असल्याचे दाखवत नागरिकांची पिळवणूक होत आहे.काही लाडक्या बहिणीचे नावे कमी न झाल्याने अनेक लाडक्या बहीणीला लाभ घेता आलेला नाही.तरीही पुरवठा विभागाला याचे सोयरसुतक नाही .हे सर्व तालुक्यात चालु असताना अधिकारी, पदाधिकारी काहीही बोलत नाही . दलालांचा वाढत्या सुळसुळाटामुळे नागरीकांची अर्थिक लुट होत आहे.

माळेवाडी ग्रामपंचायत हद्दीतील अवैद्य दारू व अवैद्य धंदे बंद करा

सरपंचासह शेकडो महिलांचा माजलगाव तहसीलवर मोर्चा!

माजलगाव। प्रतिनिधी

तालुक्यातील माळेवाडी (सुलतानपूर) येथील ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांचे संसार उध्वस्त करणाऱ्या हद्दीतील अवैद्य दारू व अवैद्य धंदे कायमस्वरूपी बंद करून या धंद्याला प्रोत्साहन देणाऱ्यावर कडक कार्यवाही करण्यासाठी काल गावचे सरपंच जयश्री नरवडे आणि त्यांच्या समवेत शेकडो महिलाचा येथील तहसीलवर मोर्चा धडकला

या परिसरात अवैद्य दारू ,मटका ,गुटखा व जुगार अड्डे बोकाळले असून या धंद्याच्या विळक्यात येथील शेतकरी ,कष्टकरी ,तरुणाई आणि सर्वसामान्य नागरिक अडकत आहे या मुळे घरा घरात भांडण तंटे निर्माण होऊन अनेकांचे संसार उध्वस्त झाले असल्याने या ठिकाणी चे सर्व अवैद्य धंदे तात्काळ बंद करून या सर्वांवर कडक कार्यवाही करावी

अशी मागणी घेऊन काल दि ४ रोजी दुपारी १ वा माळेवाडी (सुलतानपूर) येथील सरपंच जयश्री नरवडे यांच्या सह गावातील संजना लोखंडे, आशाताई लोखडे, उर्मिला नावडकर , कौशल्या नावडकर, कुशीवर्ता नरवडे, साईत्रा नावडकर, अनिता लोखंडे, , रंजना,मोरे,जयश्री तौर,गिता नरवडे,लता तौर, सुनिता भागवत ढगे (उप सरपंच), रमहानंदा राऊत, अरुणा थोरात, रुक्मिण ढगे, कालींदा ढगे, ज्योती नाईकनवरे , विजयमाला लोखंडे, सागर बाई लोखंडे,गोदाबाई लोखंडे, मनिषा पंडित,रुमन लोखडे, कमल मोरे, तुळसाबाई मोरे, सिताबाई लोखंडे, मुक्ताबाई लोखंडे,मुक्ताबाई लोखंडे,कमल लोखंडे,राधा खरात, चुतुराबाई लोखंडे,निता ढगे, अनिता नावडकर, आशाबाई लोखंडे,सुमन नावडकर, अंजना लोखंडे,कौसाबाई खेत्री , केसाबाई थोरात, मंगल नरवडे राजकन्या ठाकूरआदी महिलांनी घोषणा देत संमधीत मागण्याचे निवेदन दिले.

आता सर्व अवैद्य धंदे मुळासगट बंद केल्या शिवाय आम्ही स्वस्त बसणार नाहीत आम्ही दोन दिवसापूर्वी बीड चे एस पी यांना ही याच संदर्भात निवेदन दिले आहे आम्ही कायम पाट पुरावा करत राहू वेळ प्रसंगी आमचे हे आंदोलन आणखीन तीव्र करू असे या गावाच्या प्रथम नागरी तथा सरपंच सौ जयश्री संजय नरवडे यांनी प्रतिनिधी शी बोलताना सांगितले.

नित्रुड येथे गायकवाड, काशीद व आगे सत्कारीत;दीप इंग्लिश स्कूलच्या वतीने गौरव

दिंद्रुड । प्रतिनिधी

नित्रुड येथील बाजीराव गायकवाड हे भारतीय टपाल सेवेतून निवृत्त झाले आहेत. तर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई ''ग्रामीण बीड जिल्हा उपाध्यक्षपदी'' दिंद्रुड येथील ज्येष्ठ पत्रकार प्रकाशराव काशिद यांची निवड झाली आहे. तसेच महाराष्ट्र शासन अंगीकृत माविमच्या वतीने किट्टी आडगाव येथील वर्षा रामराव आगे यांना बचत गटासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. उपरोक्त तिघांचाही दीप इंग्लिश स्कूल व दीप मॅन्युफॅक्चरिंग युनिट च्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार संतोष स्वामी, रामराव आगे, गणेश काटकर, ज्ञानोबा कटारे, शिवराज फाटे आदींची उपस्थिती होती.

बाजीराव गायकवाड यांनी नित्रुड येथील पोस्ट ऑफिस मध्ये शाखा पोस्ट मास्तर या

पदावर ४५ वर्ष निर्विवाद सेवा केली आहे. मनमिळाऊ, मितभाषी व सेवेत नेहमी तत्पर असलेले गायकवाड सेवेप्रती एकनिष्ठ असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. तसेच पत्रकारीते मध्ये २५ वर्ष सकारात्मक पत्रकारिता करून अनेक गरजवंतांना न्याय मिळवून देण्याचे काम प्रकाश काशीद यांनी केल्याचे गौरवोद्गार मान्यवरांनी काढले. महाराष्ट्र शासन अंगीकृत असलेल्या महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या वतीने नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पांतर्गत तेजस्विनी महिलांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये वर्षा रामराव आगे यांचा उत्कृष्ट उद्योजक म्हणून मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. उपेक्षित घटकातील महिलांना संघटित करून बचत गटाच्या माध्यमातून त्यांच्या जीवनात आनंद फुलविणाऱ्या वर्षा आगे त्यांचेही सर्वांनी तोंड भरून कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीप इंग्लिश स्कूलचे प्राचार्य चव्हाण यांनी केले तर. प्रस्ताविक व आभार संस्थेच्या अध्यक्षा संजीवनी राऊत यांनी मानले. यावेळी सत्कारमूर्तींनी सत्कारास उत्तर दिले. कार्यक्रमास मनसेचे पांडुरंग जाधव, दिनेश गायकवाड, रामचंद्र आढाव, वैजनाथ लव्हाळे, पोपट आढाव, राम होळकर, सारिका गायकवाड यांच्यासह गावातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती.

जाहीर प्रगटन

मा. श्रीमती पी.डी.चव्हाण ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज २९९/२०२५

ॲड.एन.सी.शिंदे

आश्राबाई भ्र. सुर्यभान थापडे व इतर व इतर विरुध्द निरंक

अर्जदार :- १. आश्राबाई भ्र. सुर्यभान थापडे, वय-६७, वर्षे, धंदा-घरकाम, रा. ढेकणमोहा, ता. जि. बीड २. भिमा पि. सुर्यभान थापडे, वय-३५, वर्षे, धंदा- शेती, रा. ढेकणमोहा, ता. जि. बीड

(अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत सुर्यभान सुखदेव थापडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी सुर्यभान सुखदेव थापडे यांचा मृत्यु दिनांक २५.११.२०१९ रोजी ढेकनमोहा, ता. जि बीड येथे झाला असुन अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा आहे. हे मयताचे कायदेशीर वारस आहे. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत सुर्यभान सुखदेव थापडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४ मार्च २०२५ गेजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ११ एप्रिल २०२५

आदेशावरून
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

स्वाक्षरित
क लिपीक

शिक्का

अनुसूचित जाती जमातीच्या सुशिक्षित बेरोजगार युवक युवतींसाठी उद्योजकता विकास प्रशिक्षण

बीड। प्रतिनिधी

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती नव उद्योजकांसाठी विशेष सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत सन २०२४-२५ करिता निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत मराठवाडा विभागामध्ये ३२० नव उद्योजकांना निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम(व तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम ()प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन विभागीय स्तरावर छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी करण्यात आले आहे.

सदरील प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये उद्योग संधी, उद्योगाची निवड, उद्योगाचे व्यवस्थापन, लघुउद्योग, सेवा उद्योग, व्यापार उद्योग उद्योगातील विविध टप्पे, उद्योजकीय गुणसंपदा, उद्योगाची जाहिरात, मार्केटिंग, संवाद कौशल्य, प्रकल्प अहवाल, शासकीय कर्ज व अनुदान विषयक योजनांची माहिती, प्रत्यक्ष उद्योगांना भेटी, यशस्वी उद्योजकाचे मार्गदर्शन, उद्योगासाठी लागणारे परवाने, लायसन्स ,इत्यादी विषयावर निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये मार्गदर्शन करण्यात येणार असून सदरील प्रशिक्षण कार्यक्रम हा दिनांक १० मार्च २०२५ ते २४ मार्च २०२५ या कालावधी दरम्यान महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र मुख्य कार्यालय छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी निवासी प्रशिक्षण कार्यक्रमाची व्यवस्था करण्यात आली असून सदरील प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या लाभार्थींचे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत कर्ज प्रस्ताव तयार करण्यात येणार आहेत.

सदरील प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये बीड जिल्ह्यातून २० लाभार्थींची प्रत्यक्ष मुलाखती द्वारे निवड करून सदरील प्रशिक्षणासाठी पाठवण्यात येणार आहे.तसेच तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण ()कार्यक्रमांतर्गत १) सीएनसी मशीननिंग(अनुसूचित जाती प्रवर्ग) २)डीडी प्रिंटिंग अँड रिव्हर्स इंजीनियरिंग(अनुसूचित जाती प्रवर्ग)३) फूड अँड प्रोसेसिंग (अनुसूचित जमाती प्रवर्ग)४)सोलर पीव्ही टेक्निशियन(अनुसूचित जमाती प्रवर्ग) इत्यादी टेक्निकल प्रशिक्षण कोर्स आयोजित करण्यात आले असून सदरील प्रशिक्षण कार्यक्रम हा दिनांक १७ मार्च २०२५ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधी दरम्यान महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र मुख्य कार्यालय छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी ४५ दिवस निवासी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यामध्ये संपूर्ण तांत्रिक मार्गदर्शनासह उद्योजकीय मार्गदर्शन करण्यात येणार आहे सदरील प्रशिक्षणासाठी बीड जिल्ह्यातून प्रत्येक प्रशिक्षणासाठी ५ लाभार्थी याप्रमाणे २० लाभार्थी प्रत्यक्ष मुलाखती द्वारे निवड करून प्रशिक्षणासाठी छत्रपती संभाजीनगर येथे पाठवण्यात येणार आहेत.

या प्रशिक्षण कार्यक्रमांमधून एसटी अनुसूचित जमाती प्रवर्गातील तांत्रिक प्रशिक्षण १० व उद्योजकता विकास प्रशिक्षण १० लाभार्थीसे एकूण २० लाभार्थींची निवड करून पाठवण्यात येणार असून (एस सी)अनुसूचित जाती प्रवर्गातील तांत्रिक प्रशिक्षण १० लाभार्थी व उद्योजकता विकास प्रशिक्षण १० असे एकूण २० लाभार्थींची निवड करून छत्रपती संभाजीनगर येथे प्रशिक्षणासाठी पाठवण्यात येणार आहेत. सदरील प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्यातील होतकरू तरुण-तरुणींना प्रशिक्षणाद्वारे उद्योगाच्या क्षेत्रामध्ये स्वतःचे करिअर करण्यासाठी संधी मिळणार आहे. निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम दिनांक ७ मार्च २०२५ असून त्याच दिवशी दुपारी २ ते ५ या वेळेमध्ये प्रत्यक्ष मुलाखती द्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे.तसेच तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाच्या प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम तारीख १२ मार्च २०२५ असून त्याच दिवशी दुपारी २ ते ५ या वेळेमध्ये प्रवेश अर्ज भरलेल्या लाभार्थींची प्रत्यक्ष मुलाखती द्वारे जिल्हा उद्योग केंद्र संचेती बिल्डिंग गुडलक हॉटेल च्या बाजूला जालना रोड बीड या ठिकाणी निवड करण्यात येणार आहे. वरील प्रशिक्षण कार्यक्रमाचा बीड जिल्ह्यातील बेरोजगार होतकरू तरुण युवक युवतींनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक किरण जाधव बीड व श्री दत्तात्रय क्षीरसागर प्रकल्प अधिकारी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र बीड तसेच सुदाम थोटे विभागीय अधिकारी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र छत्रपती संभाजी नगर यांनी केले आहे.

सद्भावना पदयात्रेत सहभागी व्हा-गणेश बजगुडे

बीड । प्रतिनिधी

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन दादा सपकाळ यांच्या नेतृत्वात दिनांक ०८ व ०९ मार्च रोजी सद्भावना पदयात्रा मस्साजोग ते बीड निघत असुन दिवसेंदिवस वाढत चाललेला जातीयद्वोष कमी करण्यासाठी बीड जिल्ह्यातील सर्व जाती धर्मातील सुजाण बंधु भगिनींनी सहभागी होण्याचे आवाहन काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केले आहे. ०८ मार्च रोजी सकाळी स्व. संतोष अण्णा देशमुख यांना अभिवादन करुन या पदयात्रेस सुरवात होत असुन नांदुरफाटा, येळंबफाटा मार्गे नेकनुर याठिकाणी मुक्कामी असेल तसेच दुसऱ्या दिवशी ०९ मार्च रोजी सकाळी ०८ वाजता बंकटस्वामी संस्थान येथुन सुरू झालेली ही पदयात्रा मांजरसुंभा, पाली मार्गे बार्शीनाका, मोमिनपुरा मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास अभिवादन करुन सुभाष रोड, बस स्टँड मार्गे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे या पदयात्रेचा समारोप होणार आहे. या सद्? भावना पदयात्रेत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, अ. भा. काँग्रेसच्या सचिव खासदार रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील, युवा नेते आदित्य पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्यासह राज्यभरातील अनेक मान्यवर सहभागी होणार आहेत.

जागतिक महिला दिना निमित्ताने पाणी व स्वच्छतेसाठी योगदान देणाऱ्या सर्व महिलांचा होणार सन्मान

मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांची माहिती

प्रत्येक तालुक्यातून एक महिला ग्रामपंचायत मॉडेल

जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतीमधून एक महिला अनुकूल आदर्श ग्रामपंचायतींची (मॉडेल) ग्रामपंचायत म्हणून उभारणी करणेत येणार आहे.यामध्ये महिला अनुकूल आदर्श ग्रामपंचायतींची (मॉडेल) ग्रामपंचायतीची प्रत्येक तालुक्यातून किमान एक ग्रामपंचायतीची उभारणी करण्यात येणार आहे. व त्यांचा विशेष सन्मान पंचायत समिती स्तरावर करण्यात येणार असल्याचं मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले आहे .महिला मेळाव्यात समुदाय सहभागाद्वारे चर्चासत्रांचे उपक्रम आयोजित करणेत आलेले आहे.स्थानिक महिला नेतृत्वासोबत गट चर्चा किंवा कथाकथन सत्रे तसेच आरोग्याविषयी गावस्तरावर आरोग्य अधिकारी यांची मार्गदर्शने आयोजित करण्यात आलेली आहेत.समाज माध्यमे व कथा कथनाच्या माध्यमातून प्रचार प्रसिद्धी करण्यात येणाऱ्या तसेच पाणी, स्वच्छता व आरोग्य संबंधित उत्कृष्ट काम करणाऱ्या महिलांच्या प्रेरणादायी कथांना समाज माध्यमे व कथा कथनाच्या माध्यमातून प्रचार प्रसिद्धी करणेत येणार आहे. अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली आहे.

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन , उमेद अभियान , ग्राम पंचायत विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हयात पाणी, स्वच्छता व आरोग्य पाणी गुणवत्ता संबंधित उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महिलांना प्रेरणा देण्यासाठी जागतिक महिला दिवस येत्या शनिवारी ८ मार्च रोजी जिल्हा, तालुका व ग्राम पंचायत स्तरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पाणी व स्वच्छता संबंधित उत्कृष्ट व आदर्श काम करणाऱ्या महिलांचा सन्मान होणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी दिली.

जिल्ह्यात जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सर्व गावे या उपक्रमात सहभागी आहेत. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्या वतीने जिल्हयात दरवर्षी जागतिक महिला दिनी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.त्यानुसार याही वर्षी जागतिक महिला दिवस येत्या शनिवारी ८ मार्च रोजी सर्व ग्रामपंचायती मध्ये महिलांची स्वच्छतेसाठी विशेष धाव (वॉश रन) आयोजित करण्यात येणार आहे.ज्यामध्ये महिला, बचत गटातील उमेद , किशोरवयीन मुली , विद्यार्थीनी,स्वच्छता कर्मचारी,पाणी व स्वच्छता समितीचे सदस्य व ग्रामपंचायत सदस्य आणि समुदयातील प्रभावशाली लोकांचा समावेश करून पाणी, स्वच्छता व आरोग्य

◀◀ पान ३ वर

जिल्हयात जागतिक महिला दिनी राबविण्यात येणारे उपक्रम

- जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छतेसाठी धाव वॉश रनचे आयोजन करण्यात येणार आहे.
- ग्राम पंचायत स्तरावर पाणी, स्वच्छता व आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात येणार आहे.
- ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभेचे आयोजन करून पाणी, स्वच्छता व आरोग्य संबंधित कार्यक्रमाच्या अंमलबजावणी दरम्यान सद्यस्थितीत येणाऱ्या अडी अडचणीबाबत चर्चा विनिमय करणे
- जिल्ह्यात किमान एक महिला अनुकूल आदर्श ग्रामपंचायती संबंधित मॉडेलची उभारणी करणे
- शाळा व महाविद्यालय यांच्या मदतीने स्थानिक महिला नेतृत्वासोबत गट चर्चा किंवा कथाकथन सत्रे आयोजित करणे.
- पाणी, स्वच्छता व आरोग्य क्षेत्रातील महिलांच्या भूमिकेविषयी पथनाट्ये, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे.
- मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापन तसेच एफटीके किट चाचणी आणि इतर वॉश संबधी नाविन्यपूर्ण प्रशिक्षण सत्रे आयोजित करणे.
- उमेद अभियान यांच्या मदतीने स्वयं सहाय्य बचत गट यांच्या नेतृत्वाखालील पाणी व स्वच्छता क्षेत्रातील नाविन्यपूर्ण प्रदर्शन करणारे मेळावे आयोजित करणे.

सिरसमार्ग उपोषणास शेतकऱ्यांचा वाढता पाठिंबा

गावोगावचे शेतकरी घेऊ लागले सहभाग, सिंदफणा पट्ट्यात एकच चर्चा

बीड । प्रतिनिधी

जायकवाडीच्या पाण्यासह विविध मागण्यांसाठी सिरसमार्ग (ता. गेवराई) येथे चार दिवसांपासून शेतकर्यांचे उपोषण सुरू आहे. या उपोषणामुळे सिंदफणा पट्ट्यात पाण्याचीच चर्चा असून गावोगावचे शेतकरी या उपोषणास दररोज भेट देऊन उपोषणात सहभागी होत आहेत.

या उपोषणात बुधवारी कमळेश्वर धानोरा, शहाजानपूर, बहादरपूर, काळेवाडी, तरटेवाडी, मानकापूर , टाकळगव्हाण, कोळगाव, पोखरी, दिमाखवाडी, पारगाव येथील शेतकर्यांनी भेट देत सहभाग घेतला. यावेळी राजेसाहेब काका पवळ, सय्यद महाराज, बाबुराव जेठे, शामराव घुगे, काशीनाथ भावले, महादेव धुगे, राजाराम पवळ, रामराव पवळ, धुराजी महाराज कोळेकर, रंगनाथ पाबळे, नामदेव रडे, संतराम वलेकर, केशव लोखंडे, सखाराम शेजाळ, भाऊसाहेब जोशी, बंडू हजारे, सुशिल फरतारे, नारायण शेरकर, बाबुलाल घुगे, सुनिल शेरकर, मुजीब पठाण, उद्धव हजारे, कल्याण जेठे, महादेव उमाप, दादाराव उमाप, तुकाराम टाकसाळ, ईश्वर भांगे, मनोहर जेठे, सुभाष एरंडे, आदीनाथ जोगदंड , कचरू हाडुळे, संतोष जोशी, अब्दुल रहेमान, सय्यद समद, लहूराव जोगदंड, अनिल जोगदंड, सखाराम जोगदंड, भाऊसाहेब जोगदंड, राजेंद्र कांगडे, गणेश कोळेकर, पांडुरंग पन्हाळे, रामकिसन सागडे, भाऊराव पवळ आदी उपस्थित होते. या उपोषणास शेतकर्यांचा वाढता पाठिंबा असल्याने सिंदफणा पट्ट्यात सर्वत्र पाण्याचा विषय आहे. जायकवाडी धरणाचे पाणी सिंदफणा नदी पात्रात सोडावे, सिंदफणा नदीवर साखळी बंधारे बांधावेत, मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेत शेती व उद्योगांना पाणी द्यावे, नदीजोड प्रकल्प गतीने राबवावे यासह इतर मागण्यांवर विधानसभा सभागृहात चर्चा करून निर्णय घ्यावा यासाठी आंदोलन अधिकाधिक तीव्र करण्याचा निर्धारही यावेळी शेतकरी व्यक्त करीत आहेत.

डॉक्टर पथकाने केली तपासणी

सिरसमार्ग येथे तीन तारखेपासून शेतकर्यांचे उपोषण सुरू आहे. उपोषणकर्ते शेतकरी यांची बुधवारी डॉ. सुनिल बनसोडे, डॉ. बहिर यांच्या पथकाने भेट घेऊन तपासणी केली. उपोषणामुळे अशक्तपणा जाणवल्यास ओआरएस घेण्याचा सल्लाही डॉक्टरांनी दिला.

श्रीकांत देशमुख यांचे निधन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

खोलेश्वर महा विद्यालयातील निवृत्त ग्रंथालय कर्मचारी श्रीकांत माधवराव देशमुख यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७० वर्षे होते.

खोलेश्वर महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील सर्व ग्रंथांचे योग्य व्यवस्थापन अत्यंत निष्ठेने त्यांनी केले. संघ परिवारातील सर्वांसोबत त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते.दासोपंत संशोधन मंडळाच्या व्यवस्थापनातही त्यांचा सहभाग होता.

श्रीकांत देशमुख यांच्या निधनाने माणस जोडण्याचे कौशल्य,कार्य तत्परता असणारे व्यक्तिमत्त्व लोप पावल्याची भावना व्यक्त होत आहे.त्यांच्या पार्थिवावर मुकुंदराज समाधी रस्त्यालगतच्या नृसिंह तीर्थ स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या पश्चात पत्नी,मुलगा,सुन असा परिवार आहे.

सरपंच/सदस्य यांना अपात्र केलेला जिल्हाधिकारी यांचा आदेश रद्द करावा

प्रा.ईश्वर मुंडे यांची आ.जयंत पाटील यांच्याकडे मागणी

मुंबई । प्रतिनिधी

मागील दोन वर्षांपूर्वी जनतेतून निवडून आलेले राखीव प्रवर्गातील सरपंच व सदस्य यांनी आपले जात वैद्यता प्रमाणपत्र वेळेत सादर केले नाहीत या कारणास्तव श्री अविनाश पाठक,जिल्हाधिकारी बीड यांनी दि.२०/१२/२०२४ रोजी जिल्ह्यातील सरपंच व सदस्य यांना अपात्र केले.

या मध्ये अनेकांनी आपले जात वैद्यता प्रमाणपत्र विहीत मुदतीत सादर केलेले आहे.कांहीचे प्रमाणपत्र मिळाले पण उशीर झाला म्हणून दाखल करून घेतले नाही.अशा कांही चुका जिल्हाधिकारी,बीड कार्यालयाने केल्या आहेत.नैसर्गिक न्यायाच्या नियमाने संबंधितांना एखादी अंतीम नोटीस देणे अपेक्षीत असते.असे न करता अपात्र ठरवण्याचे आदेश काढणे बेकायदेशीर आहे.अशी कारवाई फक्त बीड जिल्ह्यातच केलेली आहे. तरी विधान सभा अधिवेशनात तारांकीत प्रश्न उपस्थीत करून जिल्हाधिकारी बीड यांचे आदेश

रद्द करण्यास शासनास भाग पाडावे अशी विनंती प्रा.ईश्वर मुंडे,महाराष्ट्र राज्य प्रमुख,सेवा निवृत्त अधिकारी सेल,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष यांनी मुंबई येथे आ.जयंत पाटील,प्रदेशाध्यक्ष,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष,महाराष्ट्र राज्य यांना प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

घरकुलांचे प्रश्न तात्काळ मार्गी लावा

आझाद क्रांती सेनेच्या वतीने गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

माजलगांव प्रतिनिधी

तालुक्यातील घरकुलांचा प्रश्न मार्गी लावण्या संदर्भात पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना आझाद क्रांती सेनेच्या वतीने दि ०५ मार्च बुधवार रोजी निवेदन देण्यात आले.

आझाद क्रांती सेनेच्या वतीने गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनामध्ये असे नमूद करण्यात आले की, तालूक्यातील गावांना रमाई अवास,पि.एम.व शबरी योजनेचा लाभ दिला जातो, त्या लाभा पासून ९०गावे समस्यानी वेढले आहे.त्यात सांडस चिंचोली,मनूर,मंगरूळ न१/२लवूळ, फूलेपिंपळगाव,पाञूड अशा असंख्य गावातून बरेच घरकूलचे हप्ते वर्ग झालेले नसून,घराखालील जागा व अन्य प्रश्न निर्माण झालेले आहेत.पंचायत समिती कार्यालयातून घरकुल मंजूर झालेल्या अर्ध्या लोकांना हप्ते पडतात व बाकी लोकांना हप्ते पडत नसल्यामूळे लोकांची हेळसांड होत आहे घरकुल योजनेतील लाभधारकांना घरकूल मंजूर झाले आहे म्हणून घरे पाडून ठेवली आहेत.घरकुल लाभधारकांचा संसार भर उन्हाळ्यात उघड्यावरती आला आहे पुढील हंगाम हा पावसाचा असल्याने घरकुल लाभधारकांना पावसाळ्याच्या अगोदर घर बांधून पूर्ण होणे ही गरज असतानाही मात्र माजलगाव पंचायत समिती त्याकडे डोळे झाक करत आहे घर पडलेली

◀◀ पान ३ वर

स्पर्धा परीक्षेची तयारी करत असताना अपयशाची भीती बाळगू नका –भाग्यश्री देशमुख

अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्पर्धा परीक्षेची तयारी करत असताना सातत्य ठेवणे गरजेचे असून अपयशाची भीती बाळगू नका असे मत भाग्यश्री श्रीपाद देशमुख यांनी मांडले.

नुकताच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महसूल सहाय्यक पदाचा निकाल जाहीर करण्यात आला. यात अंबाजोगाईची रहिवाशी कु भाग्यश्री श्रीपाद देशमुख यांनी यश संपादित केल्याबद्दल पेशवा प्रतिष्ठान तर्फे सत्कार करण्यात आला. प्राथमिक आरोग्य केंद्र घाटनांदूर येथे कार्यरत श्रीपाद देशमुख यांच्या मुलीच्या या यशाबद्दल पालकांचा ही सन्मान करण्यात आला.यावेळी प्रतिष्ठान चे शिरीष हिरळकर, डॉ महेश अकोलकर, श्रीकांत जोशी, गोविंद जोशी, अँड वैजनाथ वांजरखेडे, पार्थ कुलकर्णी, अधिराज कुलकर्णी, रुपेश देशमुख, तुषार जोशी, श्रीपाद देशमुख, कल्याणी कुलकर्णी , स्मिता भातलवंडे, रेणुका भालेराव, प्रणिता पोखरीकर, श्रेया जोशी,ममता दीक्षित, तृप्ती जोशी, वैशाली देशमुख यांची उपस्थिती होती.

कदम सर यांची शैक्षणिक कारकीर्द शिक्षकांसाठी प्रेरणादायी- महंत महादेवानंद भारती महाराज

पिंपळवंडी । प्रतिनिधी

गोविंद कदम सर यांनी आपल्या शिक्षक सेवेचा ३९ वर्षाच्या प्रदीर्घ कारकिर्दीत अतिशय आदर्शपणे कर्तव्य बजावीत आपल्या सेवेची शिक्षक,मुख्याध्यापक,केंद्रप्रमुख व शिक्षण विस्ताराधिकारी पदापर्यंत मजल मारीत जबाबदारी यशस्वीपणे सांभाळीत पार पाडली.त्यांची ही कारकीर्द आजच्या नवयुक्त शिक्षकांसाठी प्रेरणादायी व आदर्श ठरणारी आहे असे अश्वत्थलिंग संस्थांनचे मठाधिपती महंत गुरुवर्य महादेवानंद भारती महाराज यांनी शिक्षण विस्तार अधिकारी गोविंद कदम यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभ सोहळ्याप्रसंगी

अध्यक्षीय भाषणातून प्रतिपादन केले.तसेच ते पुढे म्हणाले की,येथून पुढील आयुष्य त्यांनी अध्यात्मिक,पर्यटन,शेती,सर्वांच्या सहवासात कुटुंबासह आनंदात घालवावे असाही शुभाशिर्वाद दिला. तसेच अध्यक्षीय भाषणातून त्यांनी शिक्षक हा सामाजातील अत्यंत महत्त्वाचा घटक असून शिक्षकांच्या उत्कृष्ट शैक्षणिक आणि समाज प्रबोधनपर कार्यामुळे समाज जागृत होऊन योग्य दिशेने वाटचाल

◀◀ पान ३ वर

युवा प्रशिक्षणार्थींना कायम सेवेत रुजू करून घ्या - बंडू खांडेकर

दिंद्रुड । प्रतिनिधी

ट्रेनी शिक्षकांचा कालावधी संपला असला, तरी त्यांनी ज्ञानदानाचे कार्य खूप चांगल्या प्रकारे केले आहे. त्यामुळे युवा प्रशिक्षणार्थींना कायम सेवेत रुजू करून घ्यावे अशी मागणी देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर यांनी केली आहे. आपण स्वतः देवदूत डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या माध्यमातून महाराष्ट्राचे संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेऊन या प्रशिक्षणार्थी शिक्षकांना सेवेत कायमस्वरूपी रूजू करून घेण्याची विनंती करणार असल्याचेही ते म्हणाले. दिंद्रुड केंद्रातील तेरा ट्रेनी शिक्षक-शिक्षिकांचा सन्मान केंद्रातील सर्व शिक्षकांच्या वतीने करण्यात आला त्यावेळी अध्यक्षीय भाषणात खांडेकर बोलत होते.

(पान ३ वर)

दिंद्रुड केंद्रातील मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थींचा सन्मान

परमेश्वर सातपुते यांनी आष्टी मतदारसंघात पक्ष संघटना मजबूत केली–परशुराम जाधव

बीड । प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने व युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे, शिवसेना नेते तथा शिवसेना सचिव विनायक राऊत, शिवसेना मराठवाडा संपर्क नेते सुनील प्रभू, मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली,शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव अध्यक्षतेखाली व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या नेतृत्वाखाली आज पाटोदा शहरातील शासकीय विश्रामगृह येथे आष्टी विधानसभा मतदारसंघातील आष्टी, पाटोदा,शिरूर तीनही तालुक्यातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

यावेळी संपर्क प्रमुख परशुराम जाधव व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी सर्व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत आप आपल्या कार्यक्षेत्रात चालू असलेल्या कार्याचा आढावा घेतला. सर्व पदाधिकाऱ्यांनी एकत्र येऊन पक्ष संघटन वाढीसाठी तन-मन धनाने काम करावे गावोगावी

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

सायबर चोरट्यांकडून महिलेची फसवणूक; तब्बल ३१ लाखांना गंडा

पुणे । प्रतिनिधी

ऑनलाईन टास्कच्या आमिषाने महिलेची सायबर चोरट्यांनी ३१ लाख ६५ हजार रुपांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सायबर चोरट्यांवर विमानतळ पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ४१ वर्षीय महिलेने तक्रार दिली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार विमाननगर भागात राहतात. गेल्या वर्षी जून महिन्यात महिलेला चोरट्यांनी मॅसेज पाठवून त्याद्वारे ऑनलाईन टास्कची माहिती दिली होती. घरबसल्या कामाची संधी असे आमिष दाखविले होते. सुरुवातीला चोरट्यांनी एक काम दिले. या कामाचे पैसेही दिले. त्यामुळे महिलेचा विश्वास बसला. नंतर मात्र ऑनलाइन टास्क या व्यवसायात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे सांगत जाळ्यात ओढले. यानंतर महिलेला वेळोवेळी बँक खात्यात ३१ लाख ६५ हजार रुपये जमा केले. पैसे जमा केल्यानंतर चोरट्यांनी परतावा दिला नाही. महिलेने रक्कम परत करण्यास मोबाइलवर संपर्क साधला. तेव्हा चोरट्यांनी त्यांचे मोबाइल बंद केल्याचे लक्षात आले. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक आशालता खापरे तपास करत आहेत.

कोथरुडमधील व्यक्तीला ३० लाखाला गंडा

कोथरूड भागातील एका नोकरदार व्यक्तीला सायबर चोरट्यांनी टास्क तसेच युट्यूबला लाईक्स मिळवून देण्यासाठी तसेच ऑनलाइन पद्धतीने कामाची संधी (ऑनलाइन टास्क) असल्याच्या आमिषाने २९ लाख ६३ हजार रुपयांना गंडा घातला आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्यांवर कोथरुड पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत ५३ वर्षीय व्यक्तीने तक्रार दिली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप देशमाने तपास करत आहेत.

लष्करात भरती करण्याच्या बहाण्याने फसवणूक

महाराष्ट्रातील मुलांना लष्करात भरती करण्याचे आमिष दाखवून प्रत्येक उमेदवाराकडून प्रत्येकी तीन लाख रुपये घेऊन लष्करात नोकरी लावतो म्हणून फसवणूक करणाऱ्या तोतया लष्करी जवानावर बंडगार्डन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिलिटरी इंटेलिजन्स आणि वन गार्डन पोलीस यांनी ही संयुक्त कारवाई केली आहे. नितीन बालाजी सुर्यवंशी (रा.मु. पो. हेळंब, तालुका देवणी, जिल्हा लातुर) असे बोगस जवानांचे नाव आहे. याबाबत भरत रमेश महाटे (वय २३, रा. नागराळ, तालुका - मुखेड, जिल्हा नांदेड गोंधळेनगर, हडपसर) यांनी फिर्याद दिली आहे. हा प्रकार १३ ऑगस्ट २०२४ रोजी ते आज रोजी पर्यंत सदर्न कमांड कैंटीन व सब एरीया कैंटीन कॅप परिसर येथे घडला आहे. यामध्ये फिर्यादीची १ लाख ७५ हजारांची फसवणूक करण्यात आली.

शिक्रापूर पोलिसांचा दणका; अल्पवयीन वाहन चालकांच्या पालकांना पन्नास हजारांचा दंड

शिक्रापूर : शिक्रापूर ता. शिरुर पोलीस स्टेशन हद्दीतील अनेक महाविद्यालय परिसरात अल्पवयीन मुले दुचाक्या घेऊन स्टंट करणे, वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणे असे प्रकार होत असल्याचे समोर आले. त्यावर शिक्रापूर पोलिसांनी सदर महाविद्यालय परिसरात दुचाक्या घेऊन येणाऱ्या पालकांना दणका देत पंचवीस वाहन चालकांकडून पन्नास हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

शिक्रापूर ता. शिरुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे, पोलीस हवालदार किशोर तेलंग, अमोल चव्हाण, विकास सरोदे, अमोल दांडगे, विकास पाटील, हनुमंत गिरमकर, महिला पोलीस हवलदार उज्वला गायकवाड, किरण निकम यांनी साहेबराव शंकरराव ढमढेरे महाविद्यालय तळेगाव ढमढेरे समोर कारवाई मोहीम राबवत अल्पवयीन दुचाकी चालकांच्या दुचाक्या ताब्यात घेतल्या. तसेच तब्बल पंचवीस दुचाक्या ताब्यात घेऊन पंचवीस वाहन चालकांकडून रोख स्वरुपात पन्नास हजार रुपये दंड वसूल करुन पंधरा हजार रुपयांचा दंड वाहनांवर ऑनलाईन पद्धतीने दंड लावण्यात आला आहे.

तर या कारवाई मुळे रोडरोमिओ वाहन चालकांनी चांगलाच धसका घेतला असून काही पालकांनी नाराजी व्यक्त केली आहे. तर यावेळी बोलताना लवकरच पोलीस स्टेशन हद्दीमध्ये कर्कश आवाजांच्या बुलेट वाहनांवर कारवाई मोहीम राबवून कर्कश आवाजांची बुलेट वाहने जप्त करणार असल्याचे पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे यांनी सांगितले. शिक्रापूर पोलिसांनी केलेल्या कारवाई बाबत काही पालकांनी आमची मुले वाड्या वस्त्यांवरुन शाळेसाठी येत असतात आमच्या येथे एस टी अथवा वाहनांची सोय नाही त्यामुळे मुले मोटार सायकलहून येतात मात्र पोलिसांनी कारवाई केल्यास मुलांना शाळेत पाठवायचे कसे असा सवाल देखील काही पालकांनी उपस्थित केला आहे.

सणसवाडीत रस्ता ओलांडताना कारची जोरदार धडक; गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीचा जागीच मृत्यू

शिक्रापूर : सणसवाडी (ता.शिरुर) येथील पुणे-अहिल्यानगर रस्त्यावर रस्ता ओलांडताना कारची जोरदार धडक बसून अपघात झाला. या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला. तर कारचे यामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या घटनेची नोंद शिक्रापूर पोलिसांत करण्यात आली आहे. शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे सचिन कमलाकर चक्रनारायण या कारचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला.

गणेश साठे (वय ४३, रा. पाटीलवस्ती सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे) असे यामध्ये मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. सणसवाडी (ता.शिरुर) येथील पुणे ते अहिल्यानगर रस्त्याच्या लगत असलेल्या चंद्रमा हॉटेल समोरून गणेश साठे हे रस्ता ओलांडत असताना अहिल्यानगर बाजूने (एमएच १४ एलयु ५१८९) ही कार भरधाव वेगाने आली. यावेळी चालकाचे नियंत्रण सुटून कारची गणेश साठे यांना जोरदार धडक बसली. यावेळी गणेश साठे हे जोरात कारच्या काचेवर आदळले. कारही दुभाजकावर जाऊन आदळली.

दरम्यान, गणेश साठे हे यामध्ये गंभीररित्या जखमी झाले. त्यानंतर त्यांचा मृत्यू झाला. याबाबत बापू रामभाऊ साठे (वय ४३, रा. पाटीलवस्ती सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी कारचालक सचिन कमलाकर चक्रनारायण (रा. डांगे चौक थेरगाव, पुणे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस हवालदार रविकिरण जाधव हे करत आहे.

सांगली जिल्ह्यातही अपघात

जत-सांगोला महामार्गावर जतपासून चार किलोमीटर अंतरावर आयशर ट्रक व दुचाकी यांच्यात समोरासमोर अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरील दोन जणांचा मृत्यू झाला. यात दुचाकीवरील दोघे हे जत तालुक्यातील शेगाव येथील असल्याची माहिती दिली जात आहे.

समृद्धी महामार्गावरही अपघात

तर दुसऱ्या घटनेत, समृद्धी महामार्गावर अपघातांचे प्रमाण कमी होताना दिसत नाही. त्यात आता पुन्हा एकदा या मार्गावर अपघाताची घटना नुकतीच समोर आली आहे. मार्गाच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकवर कॉंक्रीट टँकर धडकला. यात टँकरच्या क्लीनरचा मृत्यू झाला तर चालक गंभीर जखमी आहे. सतीशसिंग विजयसिंग (वय ३७) असे यामध्ये मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. तर रामचंद्र पाल (वय ३६) असे टँकरचालकाचे नाव आहे.

पुणे पोलिसांची धडक कारवाई; मध्यवर्ती भागातून ११ लाखांचे मॅफेड्रॉन जप्त

पुणे: पुण्याच्या मध्यभागातून एका सराईताला पकडून पुणे पोलिसांनी नंतरच्या तपासातून एक आंतरराष्ट्रीय ड्रग्ज रॅकेट उघड केलेले असताना आता नाना पेठेतून मॅफेड्रॉन (एमडी) हा अमली पदार्थ विकण्यास आलेल्या दोघांना गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने पकडले. छापेमारीत त्यांच्याकडून तब्बल ११ लाख ४० हजारांचे एमडीसह इतर असा १३ लाख ४२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अदीब बशीर शेख (२९, रा. नाना पेठ), यासीर हशीर सय्यद (३०, रा. कोंढवा) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. शहरात ड्रग्ज सप्लायरचे जाळे मोठ्याप्रमाणात वाढले आहे. या सप्लायरवर पुणे पोलिसांची नजर असली तरी ग्राहकांपर्यंत ड्रग्ज पोहच होत असल्याचेही दिसून आलेले आहे. यापार्श्वभूमीवर अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पथक हद्दीत गस्त व पेट्रोलिंग करत होते.

त्यादरम्यान नाना पेठ भागात दोघेजण थांबले असून त्यांच्याकडे एमडी असल्याची माहिती पथकाला मिळाली. यानूसार, पथकाने परिसरात सापळा रचला. तसेच, संशयित दोघे दिसताच पथकाने शेख, आणि सय्यद या दोघांना ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता एमडी आढळून आले. दोघांवर समर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड, सहायक निरीक्षक नितीनकुमार नाईक, अंमलदार आझाद पाटील, मयूर सुर्यवंशी, साहिल शेख यांच्यासह पथकाने ही कामगिरी केली.

सायबर चोरट्यांकडून महिलेची फसवणूक

ऑनलाईन टास्कच्या आमिषाने महिलेची सायबर चोरट्यांनी ३१ लाख ६५ हजार रुपांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सायबर चोरट्यांवर विमानतळ पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ४१ वर्षीय महिलेने तक्रार दिली आहे.पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार विमाननगर भागात राहतात. गेल्या वर्षी जून महिन्यात महिलेला चोरट्यांनी मॅसेज पाठवून त्याद्वारे ऑनलाईन टास्कची माहिती दिली होती. घरबसल्या कामाची संधी असे आमिष दाखविले होते. सुरुवातीला चोरट्यांनी एक काम दिले. या कामाचे पैसेही दिले. त्यामुळे महिलेचा विश्वास बसला.

आता मीटरने पाणीपट्टी आकारणी?

पुणे । प्रतिनिधी

समान पाणी योजनेअंतर्गत शहरात पाणी पुरवठ्याचे झोन तयार करण्यात येत आहेत.

त्यातील ७२ झोनचे काम पूर्ण झाले असून उर्वरीत काम मार्च २०२६ पर्यंत पूर्ण केले जाणार आहे. त्यासोबतच मीटर बसविण्याचे कामही पूर्ण केले जाणार असून त्यानंतर सोसायट्यांना मीटरद्वारे पाणीपट्टी आकारली जाणार असल्याचे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी सांगितले. शहरात सध्या केवळ व्यावसायिक मिळकतींना मीटरद्वारे पाणीपट्टी आकारली जात आहे. तर, इतर मिळकतींची पाणीपट्टी मिळकतकरात आकारली जात आहे.

आयुक्त म्हणाले की, समान पाणी योजनेसाठी केंद्र शासनाकडून जेएनएनयुआरएम आणि अमृत योजने अंतर्गत निधी देण्यात आला आहे. त्यावेळी महापालिकेने योजना पूर्ण झाल्यानंतर मीटरद्वारे पाणीपट्टी आकारण्याच्या प्रस्तावास मुख्यसभेत मान्यता देण्यात आली आहे.

सध्या, या योजनेचे काम शेवटच्या टप्प्यात असून मार्च २०२६ पर्यंत ८८ मधील शहरातील ७९ टाक्यांचे काम पूर्ण होईल. तसेच २ लाख ८० हजार मीटर बसविण्यासह, पाणीपुरवठा केल्या जाणाऱ्या १४१ झोनचे कामही पूर्ण झाले असेल. त्यामुळे, प्रशासनाकडून त्यानंतर नियमानुसार, मीटरद्वारे पाणीपट्टी आकारली जाईल.

शहरात सध्या व्यावसायिक मीटरधारकांची सुमारे ६५० कोटींची पाणीपट्टी असून गेल्या वर्षभरात केवळ २३० कोटींची वसूली झाली आहे. त्यामुळे, यापुढे या वसुलीबाबत विशेष उपाययोजना केल्या जाणार असल्याचेही आयुक्तांनी स्पष्ट केले.

खडकवासला, पवना धरणांच्या जागेवर अतिक्रमण झाले नसल्याचा दावा

पुणे । प्रतिनिधी

खडकवासला आणि पवना धरणांच्या बुडीत क्षेत्रात व जलसंपदा विभागाच्या हद्दीत कोणतेही बांधकाम झाले नसल्याचा दावा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केला आहे.

तसेच या धरणाच्या क्षेत्रात अतिक्रमण झाले नसल्याने धरणांमधील पाणी साठवण क्षमतेवर परिणाम झालेला नाही. त्यामुळे पुणे जिल्ह्यातील पाणी पुरवठयावर कोणताही परिणाम झालेला नसल्याचे विखे पाटील यांनी सांगितले.

अधिवेशनात खडकवासला व पवना धरणांच्या क्षेत्रातील जमिनीवर अतिक्रमण झाल्याबाबत पाच आमदारांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर उत्तर देताना विखे पाटील यांनी ही माहिती दिली. मागील वर्षी धरणांच्या बाजूने अतिक्रमण धारकांना नोटीसा दिल्या होत्या.

तसेच काही अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच धरण व कालवे या ठिकाणी झालेल्या अतिक्रमणांवर कारवाई करण्याच्या सूचना महसुल, गृह विभाग आणि महानगरपालिका यांना देण्यात आल्याचे विखे पाटील यांनी सांगितले.

व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी रंगणार चुरस

पुणे । प्रतिनिधी

अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र, कृषी अभ्यासक्रम व वैद्यकीय अभ्यासक्रम प्रथम वर्ष प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या एमएचटी-सीईटीसाठी यंदा विद्यार्थ्यांनी सर्वाधिक नोंदणी केली आहे. यावर्षीच्या सीईटीकरिता ८ लाख ९४ हजार ७३४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी ७ लाख ६४ हजार विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षेचे शुल्क भरून नोंदणी अंतिम केली आहे.

नोंदणीची प्रक्रिया डिसेंबरमध्येच सुरू झाली होती. त्याची मुदत २८ फेब्रुवारीला संपली. गतवर्षीच्यातुलनेत नोंदणीची संख्या यंदा १ लाख ६८ हजार ९६१ इतकी वाढली आहे. यावरुन व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी चुरस निर्माण होण्याची चिन्हे आहेत.

या दिवशी होणार परीक्षा

वैद्यकीय शाखेच्या अभ्यासक्रमांना प्रवेशसाठी पीसीबी ग्रुप, तर अभियांत्रिकी प्रवेशासाठी पीसीएम ग्रुपची सीईटी द्यावे लागेल. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र अर्थात पीसीबी ग्रुपची परीक्षा ९ एप्रिल ते १७ एप्रिल या कालावधीत होणार आहे. तसेच भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित म्हणजेच पीसीएम ग्रुपची परीक्षा १९ एप्रिल ते २७ एप्रिल दरम्यान होणार आहे.

शैक्षणिक वर्ष नोंदणीची संख्या

२०२२ - २३ - ६ लाख ६ हजार ७९०.

२०२३-२४ - ६ लाख ३६ हजार ८०४.

२०२४-२५ - ७ लाख २५ हजार ७७३. २०२५ -२६ - ८ लाख ९४ हजार ७३४.

स्वारगेट बलात्कार प्रकरणातील आरोपीचा सोलापूर, अहिल्यानगर बस स्थानकातही वावर; पोलीस तपासात नवी माहिती समोर

पुणे । प्रतिनिधी

स्वारगेट बसस्थानकात एका शिवशाही बसमध्ये २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार करण्याच्या गुन्ह्याखाली आरोपी दत्ता गाडेला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. गाडेला पोलिसांनी शिवाजीनगर जिल्हा सत्र न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायालयाने त्याला १२ मार्चपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार स्वारगेट पोलीस या घटनेचा तपास वेगाने करत आहेत. आता या प्रकरणात नवी माहिती समोर आली आहे.

स्वारगेट बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्ता गाडे याचा अहिल्यानगर, सोलापूर तसेच पुण्यातील स्वारगेट, शिवाजीनगर, शिरूर एसटी स्थानकात वावर असल्याचे पोलिसांनी केलेल्या तपासात समोर आले आहे. गेल्या दोन वर्षांतील त्याच्या ठावठिकाण्याची माहिती घेतल्यानंतर त्यामधून केलेल्या विश्लेषणातून ही माहिती पोलिसांनी मिळाली आहे.

स्वारगेट बलात्कार प्रकरणाचा तपास पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला आहे. त्यानुसार गुन्हे शाखा गाडेचा ताबा लवकरच स्वारगेट पोलिसांकडून घेणार असल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गाडेला स्वारगेट पोलिसांनी मोबाईल चोरीच्या गुन्ह्यात अटक केली होती.

तसेच २०१९ मध्ये गाडेने पुणे ग्रामीण, अहिल्यानगर परिसरातून ज्येष्ठ महिलांना सोडण्याच्या बहाण्याने लुटण्याचे गुन्हा केला होता. गाडेचा मोबाईल अजून पोलिसांनी मिळालेला नाही. मात्र, पोलिसांकडून त्याच्या मोबाईचा शोध घेण्यात येत आहे. त्याचा मोबाईल मिळाल्यानंतर पोलीस त्या मोबाईचे तांत्रिक विश्लेषण करणार असल्याचे समजते. त्यानंतर त्यामधून आणखी माहिती समोर येईल, हे पाहणे महत्वाचे असणार आहे.

गाडेचा सर्वाधिक वावर हा स्वारगेट बसस्थानकात

स्वारगेट बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्ता गाडे याच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत. तसेच त्याच्या विरुद्ध सबळ पुराव्यासाठी पोलिस तपास करत आहेत. हा खटला फास्ट ट्रक कोर्टात चालवण्यासाठी पोलीस प्रयत्न करत आहेत. पोलिसांनी केलेल्या आतापर्यंतच्या तपासात आरोपी दत्ता गाडेचा सर्वाधिक वावर हा स्वारगेट बसस्थानकात असल्याचे समोर आले आहे.

न्यायालयाच्या आदेशाने पाडलेले होर्डिंग पुन्हा उभारले; राजकीय वरदहस्त? महापालिकेची भूमिका काय?

पुणे: महापालिकेने न्यायालयाच्या आदेशानुसार वर्षभरापूर्वी पाडलेले होर्डींग पुन्हा उभारण्यात आले आहे. याप्रकरणी पडताळणी करून, त्यावर कारवाई केली जाईल असे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या होर्डींग मालकाला राजकीय वरदहस्त असल्याची माहीती पुढे येत आहे. गेल्यावर्षी हे वादग्रस्त होर्डींग महापालिकेने पाडले होते. ते पुन्हा उभे केले जात असल्याने या ठिकाणी पाहणी करण्यासाठी गेलेल्या अधिकारी आणि कर्मचारी यांना हुसकाविण्यात आले होते. याचे व्हिडिओ व्हायरल झाले होते.

टिळक चौकातील संभाजी पोलिस चौकीच्या पाठीमागील बाजून नदीपात्रालगत तीन होर्डिंग एकत्र करून दीड वर्षापूर्वी एकच भले मोठे होर्डिंग उभारण्यात आले होते. होर्डींगच्या नियमावलीला मुठ माती देवून उभरलेल्या या होर्डींगवर माध्यमांनी प्रकाश टाकला होता. यानंतर तत्कालीन महापालिका आयुक्तांनी या होर्डिंगवर जाहीरात प्रसिद्ध करण्यास बंदी घालून चौकशी करण्याचे आदेश दिले होते.

तसेच याप्रकरणी कसबा विश्रामबाग क्षेत्रीय कार्यालयातील तीन कर्मचाऱ्यांना निलंबित केले होते. त्यानंतर होर्डिंग व्यावसायिकाने सलग होर्डिंग वेगवेगळे करून तीन होर्डिंग केले होते. कारवाई होण्याची शक्यता लक्षात घेऊन होर्डिंग मालकाने कारवाईस स्थगिती मिळवण्यासाठी महापालिका न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, न्यायालयाने कारवाईस स्थगिती देण्यास नकार दिल्यानंतर महापालिकेने फेब्रुवारी २०२३ मध्ये हे होर्डिंग पाडून टाकले होते.

या घटनेस एक वर्षाचा कालावधी गेल्यानंतर त्याच होर्डींग मालकाकडून आता पुन्हा याच ठिकाणी होर्डिंग उभारणी करण्याचे काम सुरू आहे. या होर्डींग मालकाला राजकीय वरदहस्त असल्याने त्याच्यावर कारवाई करण्यात प्रशासनाकडून चालढकल होत आहे, अशी चर्चा सुरु झाली आहे. दरम्यान, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी या प्रकरणी चौकशी केली जाईल, सर्व बाबी पडताळून होर्डींग वर कारवाई केली जाईल असे नमूद केले. दरम्यान अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी देखील संबंधित क्षेत्रीय कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून माहीती मागविली आहे. या प्रकरणी योग्य ती कारवाई केली जाईल असे त्यांनी नमूद केले.